# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

**Price Rs. 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-3** **Issue - 10** एप्रिल - २०११ **April 2011**

## संपादकीय

प्रिय सभासद मित्रांनो,

नवीन आर्थिक वर्ष दि. १ एप्रिलला सुरू झाले आणि दुसऱ्याच दिवशी २ एप्रिलला मुंबापुरीत नवा इतिहास घडला. क्रिकेटचा अंतिम सामना 'वानखेडे'च्या 'रनां'गणावर रंगला आणि भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला. धोनीच्या अखेरच्या षट्काराने भारतीय संघ जगज्जेता ठरून विश्वविजयाची गुढी उभारली गेली. १९ फेब्रुवारी ते २ एप्रिल असा दीड महिना चाललेला क्रिकेटचा 'रन'संग्राम संपला तो भारतीय संघाचे विश्वविजेतेपद सिद्ध करूनच. तत्पूर्वी ३० मार्चला मोहाली येथे झालेल्या उपान्त्य फेरीत पाक संघाचा दारूण पराभव करून भारतीय संघाने अंतिम सामन्यात प्रवेश मिळविला तेव्हापासूनच कोट्यावधी भारतीय क्रिकेट प्रेमींच्या आशा नि अपेक्षा उंचावल्या होत्या. सर्वजण भारतीय क्रिकेट संघाच्या विश्वविजेतेपदाचे स्वप्न रंगवत होते. त्यासाठी मनोभावे प्रार्थना करीत होते. आपल्या भारतीय संघाने अटीतटीच्या अंतिम सामन्यात चमकदार आणि नेत्रदीपक खेळ करून श्रीलंकेच्या संघाचा पराभव केला. विश्वचषक मिळवला आणि कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न साकार केले. २५ जून १९८३ नंतर सुमारे २८ वर्षांनी 'टीम इंडिया'ने पुन्हा विश्वकरंडक जिंकण्याचा महाविक्रम करून २ एप्रिल २०११ चा सुवर्णदिन अनुभवला. या अत्युच्च यशात भारतीय संघातील प्रत्येकाचेच योगदान आहे. क्रिकेटसारख्या क्रीडाक्षेत्रात भारतीय खेळाडूंनी भारताचे नाव उज्ज्वल केले. भारताच्या राष्ट्रध्वजाची-तिरंग्याची शान राखली. संपूर्ण देशात चैतन्याची, उत्साहाची नि उत्कंठेची लाट पसरवून सर्वांचे डोळे व मने खिळवून ठेवणारा विश्वविजेतेपदाचा अंतिम सामना जिंकण्याचा महापराक्रम भारतीय क्रिकेट संघाने केला आणि या विजयाच्या सुवर्णक्षणाचे सर्व भारतीय साक्षीदार बनले.

'क्रिकेट डिप्लोमसी'च्या नावाखाली भारतीय राज्यकर्त्यांनी भारत-पाक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. या त्यांच्या 'डिप्लोमसी'मुळे भारतीय राज्यकर्त्यांची मुत्सद्देगिरी कितपत सिद्ध होते आणि भारतविरोधी दहशतवादी कृत्यांना प्रच्छन्नपणे प्रोत्साहन देणारे पाकिस्तानी राज्यकर्ते शहाणे बनून भारत-पाक संबंध कितपत सुधारतात ते भविष्यकाळच ठरवेल. आपल्या हाती शुभेच्छा नि सदिच्छा देण्याशिवाय काय आहे बरे? मात्र पूर्वीचा अनुभव असा आहे की आपले सैनिक लढाई जिंकतात पण नेते तहात हरतात आणि जवानांच्या शौर्यावर व विजयावर बोळा फिरवला जातो. म्हणजे 'लढाईत जिंकणं आणि तहात हरणं' ही आपली पूर्व परंपरा आपण विसरू शकत नाही आणि आपलं मन व्यथित होतं. असो.

नव्या आर्थिक वर्षात आपल्या केंद्र सरकारकडून (अर्थ व रेल्वे मंत्रालय) ज्येष्ठ मंडळींना व महिला वर्गाला विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत. अर्थात देशाच्या लोकसंख्येतील ज्येष्ठांचा लक्षणीय वाटा आणि निवडणूकीतील त्यांच्या मतांचे वजन व महत्त्व लक्षात घेऊनच या सवलतींचा वर्षाव होत आहे ही गोष्ट कशी विसरता येईल? तरीसुद्धा या विविध सवलतींसाठी आपण केंद्र शासनाचे आभार मानू या. केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोमर्यादा ६० ठेवलेली असताना महाराष्ट्र राज्यात सेवानिवृत्तीचं वय ६० ठेवून राज्य शासनाच्या सवलती मात्र वयाची ६५ वर्षे पूर्ण केल्यावरच लागू होतात. हा विरोधाभास अनाकलनीय व तर्काला न पटणारा आहे. 'Wisdom Prevails' या न्यायाने राज्याच्या शासनकर्त्यांना शहाणपण सुचेल आणि ही विसंगती लवकरात लवकर दूर होईल अशी आपण अपेक्षा करू या.

नव्या आर्थिक वर्षाच्या आणि गुढीपाडव्याला (दि. ४ एप्रिल) सुरू झालेल्या हिंदु नववर्षाच्या सर्वांनाच मन:पूर्वक शुभेच्छा! धन्यवाद.

क्रांतिसेन रामचंद्र आठवले
भ्रमणध्वनी - ९८६९९४१६९१

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल),पुणे

## पुणे झोनल सब्-सेंटर

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दि. ८ मार्च २०११ रोजी झालेल्या पुणे झोनल सब्-सेंटरच्या कार्यकारिणीच्या सभेमध्ये ठरविल्याप्रमाणे आपल्या पुणे झोनल सब्-सेंटरमधील (म्हणजेच पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, नाशिक, सातारा, सोलापूर व सांगली जिल्ह्यातील) सर्व सभासदांना कळविण्यात येते कीं, पुणे झोनल सब्-सेंटरची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि.१ जून २०११ रोजी **अहमदनगर येथील 'आम्रपाली हॉल', गुलमोहोर रोड,** येथे सायंकाळी ३ ते ६ या वेळेत आयोजित केली आहे. या सभेत खालील कामकाज होईल.

१) मागील दि.१४ मे २०१० च्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या सभासदांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहणे.
२) मागील दि.१४ मे २०१० च्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे. हा वृत्तांत जुलै २०१० च्या संवाद मध्ये प्रसिद्ध केला आहे.
३) मा.चिटणीसांचे वार्षिक अहवाल वाचन.
४) दि.१४ मे २०१० च्या वार्षिक सभेनंतरच्या वर्षभरात (म्हणजे १५ मे २०१० ते १ जून २०११ या काळात) ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केलीत अशा ज्येष्ठ सभासदांचा सत्कार. (अशा सभासदांना वैयक्तिक निमंत्रण पत्रे पाठवली जातील)
५) असोसिएशनच्या सद्य घडामोडींविषयी वृत्तांत कथन.
६) अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा.

कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

चंद्रकांत कुलकर्णी
चिटणीस

☺☺☺ **पाळत...**

असं म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक 'स्त्री' असते. हे खरे असेलही. पण ते लोक हे सांगायचं का विसरतात की 'त्या स्त्रीच्या' मागे त्या पुरुषाची बायको असते म्हणून! - मधु रानडे

## स्टेट बँक ऑफ इंड्या रिटायर्ड एम्प्लॉईज मेडिकल बेनिफिट स्कीम-२ (सुधारित)

### महत्वाचे निवेदन

बँकेतून ६० वर्षे पूर्ण होऊन निवृत्त झालेल्यांसाठी 'स्टेट बँक ऑफ इंडिया रिटायर्ड एम्प्लॉईज मेडिकल बेनिफिट स्कीम-२ (सुधारित) दि.१४ ऑक्टोबर २००९ रोजी बँकेने लागू केली होती व त्याची सभासद होण्यासाठीची एक वर्षाची मुदत १३ ऑक्टोबर २०१० रोजी संपली. या काळात जे पेन्शनर्स कांहीना काही कारणाने वरील योजनेचे सभासद झाले नसतील अशांसाठी ही स्कीम सभासद होण्यासाठी बँकेने पुन्हा खुली केली आहे. आता सभासद होण्यासाठीची मुदत ३० जून २०११ पर्यंत वाढवली आहे. तरी या संधीचा फायदा जे ६० वर्षे पूर्ण होऊन निवृत्त झाले पण अजून पर्यंत वरील स्कीमचे सभासद झाले नव्हते अशांनी त्वरित घ्यावा ही विनंती. या स्कीमची मुदत पुन्हा वाढवली जाणार नाही असे बँकेने संबंधित सर्क्युलरमध्ये स्पष्ट केले आहे. यासंबंधीचे बँकेचे सर्क्युलर याच अंकात पान क्र. ३ वर सभासदांच्या माहितीसाठी छापले आहे. या स्कीम मध्ये अजून सुधारणा कराव्यात व जे पेन्शनर्स बँकेची ३० वर्षे कन्फर्मड् सर्व्हिस करून निवृत्त झालेत अशांसाठीसुद्धा ही स्कीम ओपन करावी अशी मागणी आपल्या फेडरेशनने बँकेकडे स्ट्रक्चर्ड मिटींग मध्ये यापूर्वीच केलेली आहे व त्याचा पाठपुरावा चालू आहे.

- सेक्रेटरी

☺☺☺ *तिरछी तेरी चाल..*

नाक चिमटीत धरीत खेकडीण खेकड्याला म्हणाली, "शी... दूर व्हा... मला खेटायला येऊ नका... पीऊन आलात ना?"

नाही गं लाडके... आजतर 'ड्रायडे' आहे. तुला असं काय वाटलं"? खेकडा म्हणाला.

"नाही काय? आज तुमची चालच सांगतेय. नेहमीसारखे तिरकं तिरकं चालत न येता सरळच्या सरळ चालत आलात तेव्हाच मी ओळखलं.

- मधु रानडे, नाशिक, दूरध्वनी : २४२२८०८

**We give below the e-Circular issued by the Bank conveying its decision to extend the time limit to join the S.B.I.R.E. Medical Benefit Scheme - II (revised)**

## *e-Circular*

P&HRD.
Sl. No. : 37/2011 - 12
Circular No.:CDO/P&HRD-PM/8/2011-12
Wednesday,April 13,2011.
23 Chaitra 1933 (S).

All LHOs/Corporate Centre Establishments of
State Bank of India.

Madam/Dear Sir,

SBI RETIRED EMPLOYEES MEDICAL BENEFIT SCHEME-II (REMBS-II)
EXTENSION OF LAST DATE FOR EXISTING MEMBERS/EARLIER RETIREES FOR BECOMING MEMBER OF THE MODIFIED SCHEME TILL 30.6.2011

We refer to our Circular No. CDO/P&HRD-PM/45/2009-10 dated 14.10.2009 regarding modification in the SBI Retired Employees' Medical Benefit Scheme-II (REMBS-II). As regards membership of the modified Scheme, it was advised that all existing members/non-members who retired on superannuation at the age of 60 years are eligible to become members of the modified Scheme within twelve months from the date of publication of the Circular i.e before 14.10.2010, subject to conditions mentioned therein.

2. The Bank had taken many steps, through electronic/print media and our branches/offices, to make aware the eligible pensioners of the modified Scheme and the time limit for membership. The time limit has since expired. However, we have been receiving a number of representations from eligible retirees for membership of the revised Scheme. We have examined the matter and observe that since the number of retirees are very large and spread throughout the country, despite our above efforts, it is possible that some of the pensioners may not have become the member of the revised Scheme within the stipulated time limit. The Trustees of the SBI Retired Employees Medical Benefit Trust have therefore decided as under:

(i) **The last date for becoming members of the modified Scheme as mentioned in our above Circular shall stand extended to 30.6.2011.**

(ii) All branches and offices of the Bank are advised to issue letter to eligible pensioners, who have not yet opted for the Scheme, regarding extension of the date mentioned in para 2. (i) above, mentioning that this is the last such extension and all shall adhere to the time limit.

(iii) **All other instructions in this regard shall remain the same.**

3. The contents of this Circular shall be brought to the notice of all concerned.

Yours faithfully,
For Dy. Managing Director &
Corporate Development Officer

(Courtesy - "S.B.I.Pensioners' Mail"- A Monthly Magazine of SBI Pen. Assn.,Chandigarh Circle)

## Stay Positive

"Better said than done". Anybody can preach the gospel but it is very difficult to practise. There is nothing wrong in trying to stay positive and enjoy the fruit.

During my working life as also after retirement, I have come across friends, acquaintances having positive/negative/critical/accommodating/intolerable attitude to life, towards others who come into contact with them. Man is the finest creation of this universe and can think, analyze & act.

Life is never smooth and pleasant throughout. Pleasure and pain do no last forever. But expecting good things in life can make us healthier and may even lengthen our life. I meet colleagues even beyond 80 who are hale and hearty and laugh away to healthy life. On the other end there are numerous other friends who are confined to the four walls of their own world and possibly are not enjoying life which is so precious. Some of them departed from this universe immediately after their retirement.

There are a few whom I know suffered worst personal tragedies, faced them boldly and are still enjoying with whatever is left with them. The others on the smallest pretext are a completely shattered lot and have rather become a burden on their family. It is for us to pause, think and decide what type of leftover years we want to live.

When researchers look at people who have similar medical conditions, they can predict who will live longer : the one who feels his health is better, there is something about that feeling of wellness i.e. important, even - may be specially if you are ill. Optimism also seems to help you against stress. Anxiety and other negative emotions are known to be detrimental to the body especially to the immune system and having an optimistic nature seems to protect us against ill effect.

We do not have control over events which are likely to occur in our life. These are creations of the 'HiddenHand'. it is however in our hands how best to face the odds in life. A quick analysis can give us the best solution. We have to remain optimistic.

If the Sun shine is not forever, the dark clouds will also pass away. People with positive mind behave differently. They exercise more, less prone to smoking, drinking and take better diet. When sick, they actively participate in their treatment and get well soon. It is only the willingness to live better life, get you fruitful results.

Happiness is a feeling and optimism is a belief that effects your life. Happiness is fluctuating but optimism is rather stable. Get into the habit of writing down at least 3/4 good things that have happened to you during the day. Alernatively, get a Bowl and lot of pebbles, put one pebble into Bowl whenever a negative thought cross your mind. Both the acts will make your life more cheerful and worth living. Start enjoying nature in its full glory, learn to talk to the trees and see the carefree birds flying in the blue sky. Please do try and see the results for yourself.

**"Practice is always better than Preaching"**

*(An 'Editorial' appearing in March 2011 issue of S.B.I.Pensioners' Mail)*

******************************

## Access to Bank's HRMS Portal

It is complained by many members that they are unable to get access to their personalized HRMS Home page - may be due to entering wrong password more than three times - and the access is blocked/locked.

In the circumstances, the members are requested to approach their 'Pension-paying' branch and request the Branch Manager to get in touch with HRMS team at LHO through his "Manager Self-Service" system **or** on Phone and get new password.

## Latest developments on "Revision of Pension" front

**Federation has filed a writ under Article 32 in Supreme Court on 16th March 2011. A strong and effective case has been made to resolve our long pending pension issues. It is expected that it will be admitted within a month or two.**

---

आपल्या फेडरेशनने १६ मार्च २०११ रोजी, भारतीय संविधानाच्या कलम ३२ अनुसार मूलभूत हक्कांतर्गत आपल्या मागण्यांचा विचार व्हावा यासाठी, सुप्रीम कोर्टात एक याचिका, प्रख्यात वकिलांच्या सल्ल्यानुसार सर्व बाजूने विचार करून दाखल केली आहे. ही याचिका एक/दोन महिन्यात ॲडमिट होऊन त्यावर सुनावणी सुरू होण्याची अपेक्षा आहे. यथावकाश यासंबंधीची माहिती सभासदांना दिली जाईल.

– सेक्रेटरी


संवाद मधील **चेक कविता** ज्यांची गाजली त्या श्री. पद्माकर कुलकर्णी हयांचा नुकताच प्रसिध्द झालेला मराठी **काव्य संग्रह**




रसीक वाचकांचा उस्फुर्त प्रतिसाद

किंमत रू. २२५ सभासदांसाठी रू. १९० (संपूर्ण भारतात घरपोच मोफत) प्रती मागवण्यासाठी कृपया खालील पत्यावर डी.डी. पाठवणे.

**STARHUNT PUBLISHERS**
A-201, Gangotri Sangam, Plot No. B-89,
Sector-23, Seawoods, Navi Mumbai – 400 706.
Email – Starhuntpublishers@yahoo.in

**• वितरक पाहीजेत •**

संपर्क :- 09892121458


(Courtesy - "S.B.I.Pensioners' Mail" )
(A Monthly of SBI Pen. Assn.,Chandigarh Circle)

### Ten Tips for a Healthy Heart

1) Avoid excessive dietary fats, particularly saturated fats. Avoid fast food, meat, beef, pork, crab, prawns, egg-yolk and deep fried food.
2) Maintain ideal body weight.
3) Maintain target blood pressure (130/85 mm Hg)
4) Avoid smoking, reduce alcohol intake.
5) Keep blood sugar under control. Check for lipid profile and liver function tests at least once in six months.
6) Be regular in taking your medicines and follow up with your physician.
7) Watch for side effects of anti-cholesterol drugs such as statins.
8) Eat plenty of vegetavles, sprouts, fruits. Go for a high fibre diet.
9) Yoga and meditation help reduce stress
10) Exercise regularly. This helps to reduce lipid levels and body weight, enhance collateral blood supply to the heart and improves physical fitness.

It is never too late to start exercising. Wake up and start it today.

(by Shri.I.Sathiamurthy, an International Cardiologist)

### अभिनंदनीय

आपले अमरावती येथील एक सभासद श्री.गणेश गोविंद केने यांचे चिरंजीव श्री.मंगेश केने हे 'राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बडनेरा' येथे अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. ते उत्तम क्रिकेटपटू असून त्यांची अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या क्रिकेट टीममध्ये २०१०-११ या वर्षी निवड होऊन ते विद्यापीठ संघातून खेळले. त्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना 'Excellence in Sports Trophy' प्रदान करण्यात आली. तसेच श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित इंजिनिअरींग कॉलेज द्वारे घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत आंतरमहाविद्यालयीन टीम मधून खेळल्याबद्दल विशेष असे 'Excellent Player' चे प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! त्यांच्या पुढील वाटचालीस असोसिएशनतर्फे शुभेच्छा.

– सेक्रेटरी

# युनिट वार्ता

## धुळे युनिट -

धुळे युनिट तर्फे २७ फेब्रुवारी २०११ रोजी महाशिवरात्री निमित्त धुळ्यापासून ८० कि.मी. अंतरावरील नागेश्वर मंदिर येथे एक सहकुटुंब सहल आयोजित करण्यात आली होती. एकूण ७० जणांनी या सहलीत भाग घेतला. त्यात शिरपूर येथूनही १२ सभासद सहभागी झाले होते. सकाळी ८ वाजता बसने धुळ्याहून निघून १०।। चे सुमारास सर्वजण गडाच्या पायथ्याशी पोहोचले. उपमा व चहा असा नाश्ता झाल्यावर ताज्या दमाने, ३०० च्या वर पायऱ्या असलेला नागेश्वर गड, 'ओम नम: शिवाय' इत्यादी घोषणा देत चढायला सुरूवात केली. ज्यांना गुढगेदुखीचा त्रास आहे असे सभासद जीपने गडावर पोहोचले. वर पोहोचल्यावर सर्वांनी नागेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन तेथील सभागृहात कांही काळ बसून गडावरील थंड हवेत श्रमपरिहार केला. त्यावेळी श्री.किशोर करोडे यांनी मंदिराबद्दल सविस्तर माहिती सांगितली. तसेच श्री.साहेबराव देसाई यांनी फेडरेशनस्तरावर चालू असलेल्या असोसिएशनच्या कामाबद्दल व इतर उपयुक्त माहिती दिली. मनोरंजनासाठी श्री.सुरेश माहेश्वरी व श्री.किशोर करोडे यांनी सर्वांना कांही गमतीदार खेळांमध्ये सहभागी करून घेतले. दुपारी १.३० च्या सुमारास गडाखाली आल्यावर सहभोजनाचा कार्यक्रम झाला. त्यात खानदेशच्या प्रसिद्ध दाळ-बाटी, साजूक तूप व साखर याचा समावेश होता. त्यावर यथेच्छ ताव मारल्यावर मंडळी पुढील प्रवासाला निघाली. वाटेत एका सूत गिरणीला भेट देऊन मशिनरीच्या सहाय्याने कापसापासून सूत व कापड कसे बनते ह्याची माहिती सर्वांनी घेतली. नंतर तेथून जवळच शिरपूर जवळील दहिवद येथील साखर कारखान्याला भेट दिली. उसाच्या रसाचा भरपूर आस्वाद घेत, साखर निर्माण प्रक्रियेची संपूर्ण माहिती करून घेतल्यावर व साखर कारखान्याच्या व्यवस्थापक मंडळाचे आभार मानल्यावर शिरपूर येथील प्रसिद्ध ॲम्युझमेंट गार्डन बघण्यासाठी सर्वजण गेलो. तेथील बागेतील एक तासाच्या वास्तव्यातील श्रमपरिहारानंतर तेथेच श्री.साहेबराव देसाईंनी सहलीसंबंधीच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या निमित्ताने सर्वांना बोलते केले. महाराष्ट्रातील इतर स्थलदर्शनासाठी अशा प्रकारच्या सहली काढाव्यात अशी सर्वांनी इच्छा प्रकट केली. नंतर सर्वजण परतीच्या प्रवासाला लागून रात्री १०।। चे सुमारास घरोघरी परतले. त्यावेळी टी.व्ही.वर भारत-इंग्लंडची वर्ल्डकप साठीच्या क्रिकेट मॅचची शेवटची ओव्हर चालू होती. त्याचा आस्वाद घेत व दिवसभराच्या सहलीच्या आठवणी मनात घोळवत गादीवर शांत झोप केव्हा लागली हे कळलेच नाही.

- किशोर करोडे, सहा.सचिव, धुळे युनिट

## यवतमाळ युनिट -

यवतमाळ येथील आपल्या युनिटचे वार्षिक स्नेहसंमेलन २७ फेब्रुवारी २०११ रोजी मंजुषा मंगल कार्यालय येथे श्री.आर.व्ही.घावडे, माजी सहा.महाव्यवस्थापक, यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या संमेलनास विशेष अतिथी म्हणून असोसिएशनच्या नागपूर विभागाचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई तसेच विभागीय सेक्रेटरी श्री.जयंत वकील, त्याच बरोबर माजी सहा.महाव्यवस्थापक श्री.व्ही.डी.देशपांडे, क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाचे सहा.महाव्यवस्थापक श्री.सुरेशचंद्र शर्मा, मुख्य व्यवस्थापक (जी.बी.) श्री.सुधाकर कुलकर्णी आणि स्थानिक चारही शाखांचे व्यवस्थापक प्रामुख्याने उपस्थित होते. युनिटचे खजिनदार श्री.उमेशचंद्र इनामदार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यांनी सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले. तसेच असोसिएशनचे वरिष्ठ पदाधिकारी माननीय श्री.बी.जी.दांडेकर, श्री.व्ही.एम.गोखले, श्री.आर.एन.लळिंगकर व श्री.सुधाकरजी चिंचाळकर, श्री.यु.एम.राऊतसाहेब, श्री.पी.एस.दाणी इत्यादींच्या शुभेच्छा प्राप्त झाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांचे हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून झाले. आपले सदस्य श्री.शरद चिंचोळकर यांच्या स्नुषा सौ.वैष्णवी यांनी सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. त्यानंतर आपल्या दिवंगत सदस्यांना व बँकेच्या दिवंगत कर्मचाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

युनिटचे अध्यक्ष श्री.उदय देशपांडे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर सचिव श्री.गोपाळकृष्ण गाडगे यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यानंतर वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून ज्येष्ठ सभासद श्री.प्रभाकर रोठे यांचा श्री.व्ही.डी.देशपांडे यांचे हस्ते व मनोहर देशपांडे यांचा नागपूर विभागाचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई यांचे हस्ते सत्कार करण्यात आले. श्री.प्रभाकर रोठे व त्यांच्या सुविद्य पत्नि सौ.आशाताई यांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाले म्हणूनही उभयतांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री.रोठे यांनी असोसिएशनला देणगी म्हणून रु.१००१ चा चेक दिला. आपले ज्येष्ठ सदस्य श्री.डी.एस.गोखले यांनी त्यांच्या वयाची ७६ वर्षे पूर्ण झाली म्हणून असोसिएशनला रु.१००१/- ची देणगी दिली.

श्री.व्ही.डी.देशपांडे यांनी आपल्या भाषणात आपल्या पेन्शनर्स असोसिएशनने एखाद्या ट्रेड युनियन चळवळीप्रमाणे कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रमुख पाहुणे श्री.शर्मा साहेबांनी आपल्या भाषणात निवृत्तीनंतरचे जीवन कसे सुखी, सुंदर व आनंदी ठेवावे, तसेच त्यातूनच आंतरिक अनुभूतीची जाणिव इत्यादी विषयी मौलिक मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री.घावडे यांनी जुन्या पेन्शनर्सच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधून त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्या सोडविण्यासाठी असोसिएशने दाखल केलेल्या कोर्ट केसेस विषयी माहिती दिली व सर्व सभासदांना लीगल फंडाला मदत करण्याचे आवाहन केले. त्याच बरोबर सभेला सभासदांची उत्तम उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. विभागीय सचिव श्री.वकील यांनी आपल्या भाषणात सभासदांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देऊन

सदस्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यास सदैव प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. युनिटचे सहसचिव श्री.दत्तात्रय भोंबे यांनी आभार प्रदर्शन केले.

त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमात श्री.पी.बी.भेंडेसाहेब, श्री.पी.आर.सरपटवार, सौ.शुभांगी सहस्रबुद्धे, सौ.तारा कुलकर्णी व सौ.स्मिता कुलकर्णी यांनी भाग घेऊन सभासदांचे मनोरंजन केले. या सभेस जवळपास १०० सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री शरद्चंद्र हमिने, किरण पांडे, उदय देशपांडे, गोपाळकृष्ण गाडगे,उमेशचंद्र इनामदार, प्रकाश जवळेकर, मोहन मोहदरकर व विजय पांडे इत्यादींनी खूप परिश्रम घेतले.

– गोपाळकृष्ण गाडगे, सचिव (यवतमाळ युनिट)

## अमरावती युनिट –

आपल्या असोसिएशनच्या अमरावती युनिटच्या सर्व सभासदांचे स्नेहसंमेलन शुक्रवार दि.१ एप्रिल २०११ रोजी अमरावतीच्या ब्राह्मणसभा सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद आपल्या बँकेच्या नागपूर विभागातील रीजन ५ च्या क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाचे सहा.महाप्रबंधक श्री.भास्कर मोतीखाये यांनी भूषविले होते. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते पारंपारिक सरस्वती पूजन व दीप-प्रज्वलन करून झाले. या कार्यक्रमाचे आयोजनात नागपूरच्या व्होखार्ट हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.लाघवेंदू शेखर यांचाही सहभाग होता.

अमरावती युनिटचे अध्यक्ष श्री.निमदेव यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.मोतीखाये आणि व्होखार्ट हॉस्पिटलचे डॉक्टर व त्यांचे सहकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर गेल्या वर्षभरात निधन पावलेल्या आपल्या सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर सचिव श्री.खोब्रागडे यांनी, युनिटच्या गेल्या वर्षभरातील केलेल्या कामाचा आढावा घेऊन सभासदांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी बँकेच्या विभागीय कार्यालयाशी संपर्कसाधून केलेल्या कार्याची थोडक्यात माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेच्या पेन्शनर्सच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना येणाऱ्या सर्व अडचणींचे प्राधान्याने लक्ष पुरवून योग्य ते सहकार्य करण्यास व स्थानिक स्टाफच्यावतीने दर्जेदार सेवा प्रदान करण्यास प्रयत्नशील राहण्याची ग्वाही देऊन श्री.मोतीखाये साहेबांनी असोसिएशन करीत असलेल्या कार्याची स्तुती केली व सर्वांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

त्यानंतर वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या श्री.पी.एन.मोहदरकर व श्रीमती भूमनीबाई पांडे यांचा अनुक्रमे सह.महाप्रबंधक श्री.मोतीखाये व सौ.निमदेव यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे श्री.बी.डी.पांडे, सौ.स्नेहलता पावडे व सौ.मालती जोशी हे कार्यक्रमास हजर राहू शकले नाहीत. त्यांचा सत्कार नंतर श्री.निमदेव व सचिव श्री.खोब्रागडे यांनी त्यांचे घरी जाऊन त्यांना सदिच्छा देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. योगायोगाने आपले एक सदस्य श्री.तुळशीदासजी यादव यांचा वाढदिवस १ एप्रिल रोजी असल्याने अध्यक्षांनी गुलाबपुष्प देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले.

उतार वयात बहुतेकांना गुडघेदुखी, स्पॉंडिलायटिस इत्यादी आजारांचा त्रास होत असतो. या रोगांबद्दल सर्वंकष माहिती व त्यावरील उपचार याबद्दल डॉ.लाघवेंदू शेखर यांनी व्हीडीओद्वारे माहिती दिली व सभासदांच्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री.शाम कुऱ्हेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री रमेश ओझरकर, भाऊराव अंबाडकर, श्रीराम खजूरकर व विलास वडवेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सुरुची भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

– डी.बी.खोब्रागडे, सचिव (अमरावती)

## नाशिक युनिट –

दि.५ मार्च२०११ रोजी दुपारी ४ वाजता नाशिक येथील सभासदांचा स्नेहमेळावा गद्रे मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. मेळाव्यास २०९ सदस्यांनी उपस्थिती नोंदवली. सभागृहाच्या प्रवेशद्वारातच सदस्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर ठीक ४॥ वाजता सौ.जयश्री शहा यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमास सुरूवात केली. श्री.जयप्रकाश तोरणे यांनी प्रास्ताविक केले.

गतवर्षात दिवंगत झालेल्या सर्व सभासदांना २ मिनीटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मागील वर्षभरात नाशिक जिल्ह्यातून २५ अधिकारी/कर्मचारी निवृत्त झाले. त्यापैकी १८ जणांना सभासद करून घेण्यात आले. सभागृहात उपस्थित असलेल्या अशा नवीन सभासदांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले.

नाशिक मधील एक ज्येष्ठ सदस्य श्री.पी.एस.लवाटे यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली म्हणून त्यांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्या वैवाहिक आयुष्याला ५१ वर्षे पूर्ण झाली म्हणून उभयतांचा सत्कार करून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. श्री.लवाटे यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात, सर्व सदस्यांनी दाखवलेल्या आपुलकीबद्दल आभार मानले.

नाशिक शहरात बँकेचा दवाखाना सुरू करावा यासाठी गेल्या दोन वर्षापासून सर्व स्तरांवर सतत प्रयत्न चालू होते. अखेरीस दीर्घ प्रतिक्षेनंतर मुंबई मुख्य कार्यालयाकडून या दवाखान्यास मंजुरी मिळाल्याचे सभेत सांगून, क्षेत्रीय कार्यालयाकडून दवाखाना चालू करण्यासाठीची आवश्यक कारवाई सुरू करण्यात आल्याचे सांगितले. आता सर्वांकडून दवाखान्याच्या कारभारात प्रत्यक्ष सहभाग/योगदान मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

त्यानंतर सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पेन्शनवाढी संदर्भातील घडामोडींबद्दल माहिती. पुणे कार्यालयातील पदाधिकारी

अडचणींमुळे येऊ न शकल्याने श्री.बेळे, सचिव, यांनी फेडरेशन स्तरांवर चालू असलेल्या, त्यासंबंधीच्या हालचालींची माहिती दिली. अमरावती येथील असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाच्या त्रैमासिक सभेतील चर्चेस अनुसरून त्यांनी आपल्या फेडरेशनने आपल्या प्रलंबित मागण्यांची तड लावण्यासाठी सुप्रिम कोर्टाचा दरवाजा ठोठावण्याच्या घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली.

अखेरच्या सत्रात सदस्यांच्या विविध अडचणींबाबत, विशेष करून स्थानिक शाखांमधून व्यवहार करतांना येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. त्यासाठी संघटनेमार्फत्त सहकार्य करावे असे सुचविले गेले. खरं तर, स्थानिक कार्यकर्ते याबाबत सतर्क आहेतच. तरीही त्यावर चर्चा होऊन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सदस्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांचे निराकरणासाठी प्रयत्नशील असावे व त्यासाठी महिन्यातील एक दिवस एकत्र येऊन चर्चा करावी असे सुचवले. सभेच्या शेवटी श्री.आप्पा सटवे यांनी क्षेत्रीय अधिकारी, झोनल ऑफिस पुणे व नाशिक येथील शाखाधिकारी यांचे कडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. अल्पोपहारानंतर सायं.६ वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.

– वामन बेळे, सचिव (नाशिक)

## नांदेड युनिट –

आपल्या नांदेड येथील उत्साही कार्यकर्त्यांनी गेल्यावर्षी स्थानिक सभासदांसाठी एक 'वार्तालाप' नावाचे त्रैमासिक चालू केले आहे. सुरूवातीला २ अंक हस्तलिखित प्रसिद्ध करून असोसिएशनच्या स्तरावरील माहिती देण्यासाठी, तसेच स्थानिक लेखकांना लिहिते करण्यासाठी, त्यांचे विचार / अनुभव सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'वार्तालाप' हे एक माध्यम उपलब्ध करून दिले आहे. आता हे वार्तापत्र कंप्युटरवर तयार (डी.टी.पी.) करून सभासदांपर्यंत पोहोचवण्यात येते. त्याचा आर्थिक भार सर्व सभासद उचलतात. या वार्तापत्राच्या संपादनाची जबाबदारी श्री.रमेश बेलोकर यांनी स्वीकारली आहे. ह्या यशस्वी उपक्रमाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! त्याचबरोबर ते नांदेड युनीटच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही सांभाळतात. नांदेड युनिव्टचे सचिव श्री.एम.टी.देशपांडे व त्यांचे इतर सहकारी यांचेही अभिनंदन. त्यांच्या या उपक्रमास असोसिएशनतर्फे शुभेच्छा !

– सेक्रेटरी

## सोलापूर युनिट –

मराठी माणूस तसा बोल घेवडा. फुरसतीचा वेळ मिळाला की गप्पात रंगणारा. परंतु स्त्रियांना त्यांच्या 'रांधा, वाढा, उष्टी काढा' – ह्या नेहमीच्या कामाव्यतिरिक्त एकत्र येण्यासाठी तशी संधी कमीच असते. सुख-दु:खाच्या चार गोष्टी करण्यासाठी, सासर-माहेरविषयी बोलण्यासाठी म्हणून तर हिंदू धर्मात सणांची योजना केली आहे. सत्यनारायण, बारसं, मंगळागौर सोडून संक्रांतीला तिळगूळ, श्रावणातील हळदी कुंकू – या दिवशी मग बायका एकत्र येतात.

अशाच एका आगळ्या हळदी कुंकू आणि तिळगूळ समारंभाचं एकत्रित आयोजन स्टेट बँकेच्या निवृत्त 'स्त्री' कर्मचाऱ्यांनी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या 'होम मिनीस्टरांनी' केलं होतं. या तिळगूळ समारंभाच्या निमित्ताने 'हळदी-कुंकू' हे सौभाग्याचं लेणं आणि त्यासोबत घरगुती उपयोगाची 'भेटवस्तू' देण्याचा कार्यक्रमही या 'महिलांनी' ह्या दिवशी केला. विशेष म्हणजे सोलापूर शहरातीलच नव्हे तर सोलापूर जिल्ह्यातील सर्व स्टेट बँक कुटुंबियांना निमंत्रणं धाडली होती. त्या व्यतिरिक्त,बँकेच्या स्त्री ग्राहकांनाही आग्रहाचं आमंत्रण केलं होतं.

'रथसप्तमीचा' मुहूर्त साधून ४ फेब्रुवारी रोजी आपल्या 'बाळीवेस' शाखेत हा समारंभ सायंकाळी आयोजित केला होता. २०० हून अधिक महिलांनी या आनंद सोहळ्यात भाग घेतला. सौ.मित्रवृंदा सोरटूर, श्रीमती पुष्पा कासट, श्रीमती ताम्हणे, सौ.नंदिनी बेंद्रे, सौ.शुभदा देशपांडे यांच्या पुढाकाराने हा आगळा तिळगुळ व हळदी-कुंकू समारंभ संपन्न झाला. आजच्या 'संवाद' हरवत चाललेल्या 'ग्लोबलायझेशन' च्या जमान्यात स्त्रियांनी स्वत:च ठरवून एकत्र येणं हे कौतुकच नव्हे काय?

– तम्मा पाटील, सचिव (सोलापूर)

## कोल्हापूर युनिट –

आपल्या कोल्हापूर युनीटच्या तर्फे समस्त महिला सभासद/ सहसभासद व फॅमिली पेन्शनर्स यांचा एकत्रित तिळगूळ व हळदी-कुंकू समारंभ दि.९ फेब्रुवारी २०११ रोजी सायंकाळी ५ वाजतां जवळजवळ १०० महिलांचे व पुरूष सभासदांचे उपस्थितीत साजरा झाला. यावेळी सौ.सुषमा रमेश कुलकर्णी, सौ.पोंक्षे, सौ.कानिटकर, सौ.बसरीकट्टी व सौ.सुषमा अशोक कुलकर्णी यांनी सुरेल आवाजात विविध प्रकारची गाणी सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. त्यानंतर सौ.सुषमा अशोक कुलकर्णी यांनी प्रात्यक्षिकांसह भारूड सादर करून उत्तम मनोरंजन केले. सौ.बेकिनकर यांनी संकलित केलेले 'बायको' या विषयावरील मनोगत सौ.करंबेळकर यांनी वाचून दाखविले व कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर श्री.वि.स.कुलकर्णी यांनी विडंबनात्मक काव्य ऐकवून सर्वांना हसवून सोडले. कै.श्री.बाळासाहेब दैनी यांची स्नुषा सौ.अमृता हिने स्वरचित काव्य वाचून दाखविले. त्यातील कोल्हापूरातील पेन्शनर्सच्या निवृत्तीनंतरच्या स्वछंदी जीवनातील सहली, निरनिराळे एकत्रित कार्यक्रम, गप्पा-गोष्टी, बुधवारकट्टा इत्यादी सर्वांच्या अनुभवांचा केलेला उल्लेख सर्वांना भावला. शेवटी तिळगूळ वाटप व हळदी-कुंकू देवाण-घेवाण होऊन या रंगतदार कार्यक्रमाची सांगता झाली. या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन सौ.बेकीनकर व सर्वश्री मुधाळे, दिवाण, पाटील, पत्की,रुकडीकर, कुलकर्णी इ. कार्यकर्त्यांनी केले होते.

– जगदीश दिवाण, अध्यक्ष (कोल्हापूर युनिट)

We reproduce a letter (a copy of which has been received by our President Shri.V.M.Gokhale) from Shri.J.N.Kapur, our Pensioner from New Delhi in respect of effective use of Right to Information Act - 2005 for information of members.

*******************************************************

**Circular Letter**

Shri. J. N. Kapur
33-34, Bank Enclave, Ring Road,
Rajouri Garden, New Delhi - 110027
Mobile : 09810449702
Dt.: 5th February 2011

Dear Friend,

**Land Mark Judgment of the Information Commissioner, Central Information Commission, in the Appeal filed by J.N.Kapur under R.T.I.Act - 2005**

I sought certain information from the Central Public Information Officer, Municipal Corporation of Delhi, West Zone in respect of demolition of Mansarovar Club vide my application dated 4th March 2009. The C.P.I.O. did not provide the information despite repeated instructions from the 1st Appellate Authority. I filed an appeal before the Central Information Commission on 5th October 2010. Shri.Shailesh Gandhi, Information Commissioner passed two orders dated 2-12-2010 and 05-01-2011 in this appeal.

The highlights of these orders are as under :

i) The Commission sees that this is a case where the Appellant has been harassed by the obduracy and obfuscation of the PIO of a very rare kind and therefore under its power under Section 19(8)(b) of RTI Act directing the PIO to ensure that a compensation of Rs.5,000/- is paid to the Appellant for the loss and detriment suffered by him and harassment caused to him. He is also directed to ensure that a cheque of Rs.5,000/- as compensation is sent to the Appellant before 15th January 2011 (Note : The payment has since been made to me by M.C.D.)

ii) Show Cause notice was issued to the C.P.I.O. under Section 20(1) and he was directed to give reasons to the Commission to show cause why penalty should not be imposed on him.

iii) It also appears they persistently refused the information in spite of repeated reminders to the respondents hence the Commission is also considering recommending disciplinary action under Section 20(2) against them.

iv) The Appellant (J.N.Kapur) would like to inspect the relevant records on 18th January 2011, and if required on 19th January 2011 from 11.00 a.m. onwards. The PIO will give attested photo copies of records which the Appellant wants free of cost, up to 200 pages. (Note : After inspection copies of 376 pages duly attested supplied to the Appellant - J.N.Kapur).

v) Appellant claims that after he had filed the second appeal before the Commission he has received the threats on telephone asking him not to pursue the matter. The Commission expects that MCD will take adequate steps to see that the Appellant comes to no harm.

vi) As per the provisions of Section 20(1) of the RTI Act 2005, the Commission finds this a fit case levying penalty on Mr.K.D.Sharma, the then AE (West Zone) and Mr.A.K.Gupta, present AE (West Zone), Mr.T.C.Meena, JE (West Zone) and Mr.V.R.Bansal, PIO & SE-I (West Zone). Since the delay in providing the correct information has been over 100 days, theCommission is passing an order penalizing all four officers Rs.25,000/- each, which is the maximum penalty under the Act.

The Commissioner, Municipal Corporation of Delhi is directed to recover the amount of Rs.25,000/- each from the salaries of Mr. K.D.Sharma, the then AE (West Zone) and Mr.A.K.Gupta, present AE (WZ), Mr.T.C.Meena, JE(West Zone) and Mr.V.R.Bansal, PIO & SE-I (WZ) and remit the same by a demand draft or a Banker's Cheque in the name of the Pay & Accounts Officer, CAT, payable at New Delhi and send the same to Shri.Panjkaj K.P.Shreyaskar, Jt. Registrar and Dy. Secretary of the Central Information Commission, 2nd Floor, August Kranti Bhavan, New Delhi-110066. The amount may be deducted at the rate of Rs.5,000 per month from the salary of each of the four officers and remitted by the 10th of every month starting from February 2011. The total amount will be remitted by 10th June 2011.

This is for your information and for further circulation to encourage citizens to take advantage of RTI Act 2005.

If you are interested for full copies of both orders you may ask for the same. With all the best wishes.

Yours sincerely,
J.N.Kapur

We reproduce below the matter regarding - How to prepare 'WILL' published by us earlier in SAMVAD for October 2007 and January 2008 for benefit of new members

*********************************************************

## Preparation of 'WILL'

One of the social responsibility of the retirees shall be to prepare a 'Will' as to the disposal of their estate after their death. The reason being the legal heirs should not be put to unnecessary difficulties in deciding about the disposal of the Assets. The simple definition of a Will is the last desire of the testator.

The Will can cover anything. Our Pensioners have been requesting the Association to give them guidance as regards the preparation of the 'WILL'. The Will should be complete to avoid confusion at a later date. It should not only contain the method of sharing of the real estate alone. It is preferable to cover all gold ornaments, silver articles, shares and Investments, Cash, Vehicles etc. We, therefore, provide full details on the subject.

## How to make your 'Will'

1) A Will can be hand written in ink but preferably should be typed.

2) It does not require any Stamp Paper and it need not be Registered.

3) It should preferably be drafted by a lawyer and checked by an Accountant.

4) It is advisable to name in your Will, more than one executor to administer the estate and distribute the property, as per your desire.

5) The Will must be signed by you in the presence of at least two witnesses who must also sign Will at the same time. Their full names and addresses should be given.

(Note : Witnesses need not know the contents of the 'WILL')

6) The executor or beneficiary cannot attest the WILL as a witness.

7) The executor of the WILL can also be named as a beneficiary and vice versa.

8) Sign each page of the WILL, so that nobody can substitute a page later on, nor can anybody argue about fraudulent insertion of a page subsequently.

9) Keep your WILL in a safe place (e.g. in a Bank Locker). Inform the executor and beneficiaries where the WILL is kept. Also give a signed copy to your Lawyer.

10) Review your WILL regularly, say once a year. It may need amending to take care of changes in your financial or family circumstances.

11) On the demise of the spouse, the surviving spouse needs to revise his/her WILL.

12) Making a WILL is one of the important and integral part of personal financial planning. Normally, all of us avoid making it. A WILL enables each one of us distribute our property and assets in the manner we wish to distribute it. A WILL may also reduce the risks of undue litigation, delays, misunderstandings and disputes amongst family members.

N.B.- Members may consult their Lawyers in the matter for further clarifications, if any)

**********************

## इच्छापत्राविषयी

वरील विषयावर आपल्या ऑक्टोबर २००७ च्या अंकात व्यासपीठ उपलब्ध करून आपण 'संवाद'ची यथार्थता पुनश्च एकदा सिद्ध केलीत. काही मुद्यांची खालीलप्रमाणे भर घालू इच्छितो :-

१. मृत्युपत्र हा शब्द अशुभ वाटतो. तसेच पूर्वीच्या सामाजिक परिस्थितीनुसार याची गरजही कमी भासत असे. त्यामुळे मृत्युपत्र करणेबाबत अनामिक भीति वाटते व त्यामुळे चालढकल केली जाते.

२. (चौथी ओळ) The will can cover anything. आपल्या इच्छापत्रानुसार फक्त स्वकष्टार्जित मालमत्ता आणि वडिलोपार्जित मालमत्तेतील फक्त स्वत:चा वाटा व हक्क यांचेच वाटप करता येते.

३. टंकलिखित / D.T.P इच्छापत्राच्या Xerox प्रती चांगल्या निघतात. अक्षर सुवाच्य नसेल तर गोंधळ निर्माण होऊ शकतो. म्हणून इच्छापत्र टंकलिखित किंवा D.T.P. असावे. हस्तलिखित इच्छापत्राविरूद्ध कोणतेही कायदेशीर बंधन नाही.

४. इच्छापत्र कोणत्याही भाषेत करता येते. त्यात शब्दच्छल, बोजड भाषा वापरू नये. मसुदा जास्तीत जास्त सोप्या भाषेत असावा, जेणेकरून मजकुर जास्त स्पष्टार्थी होईल व भविष्यात कटुता, वादविवाद यांची शक्यता कमी होईल. त्यामुळे इच्छापत्राचा मसुदा आपल्याला हव्या त्या भाषेत वकील, अकाउन्टंट किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून सोप्या व सरळ भाषेत करून घ्यावा.

५. इच्छापत्राच्या कमीत कमी दोन साक्षीदारांपैकी एक वैद्यकीय क्षेत्रातील साक्षीदार असल्यास उत्तम, विशेषत: ज्येष्ठांच्या इच्छापत्राकरिता.

६. इच्छापत्राच्या प्रत्येक पृष्ठाच्या (पानाच्या नव्हे) सुरूवातीला वर व तळाला शेवटी पूर्ण स्वाक्षरी करावी. प्रत्येक पृष्ठाला क्रमाने पृष्ठ क्रमांक द्यावेत.

७. फक्त बदलत्या आर्थिक, सामाजिक व मुख्य म्हणजे कौटुंबिक कारणांकरिता अगदीच निकड भासली तरच पूर्वीचे इच्छापत्र बदलून नवीन करावे. तसेच नवीन इच्छापत्र करताना पूर्वीची सर्व इच्छापत्र/पत्रे रद्दबातल करून फक्त हे नवीन इच्छापत्र अंतिम व बांधील आहे असे स्पष्ट निवेदन नवीन इच्छापत्रात करावे.

८. पूर्वीच्या इच्छापत्रातील कोणत्याही वारसाचे/ हक्कदाराचे (फक्त Spouse चे नाही) निधन झाल्यास नवीन इच्छापत्र करणे आवश्यक आहे, कारण फक्त हयात व्यक्तींनाच आपल्या मालमत्तेचा भाग मिळू शकतो.

९. इच्छापत्रात ज्या मालमत्तेचे वाटप केलेले आहे, त्या मालमत्ता सोडून उरलेल्या सर्व मालमत्तांची वाटणी मृत व्यक्तीच्या वैयक्तिक (Personal Laws: Hindu, Parsi, Mohmedean etc.) कायद्यानुसार होते.

१०. स्वत:चे बचत खाते, लॉकर्स इत्यादीकरिता ज्या वारसदाराला आपण ह्या गोष्टी (म्हणजे पैसे, दागिने इत्यादी) देणार आहोत त्याच वारसदाराबरोबर संयुक्त (Joint) नावे खाते उघडावे.

११. इच्छापत्र परिपूर्ण होण्याकरिता इच्छापत्रकर्त्याने असे निवेदन द्यावे की, तो/ती इच्छापत्र करतांना मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे, कोणीही कोणताही दबाव आणलेला नाही, भावना प्रधान होऊन हे इच्छापत्र केलेले नाही, तसेच कोणत्याही नशील्या, अंमली पदार्थांच्या अंमलाखाली हे इच्छापत्र केलेले नाही, तर जास्त चांगले.

– सी. डी. चव्हाण, मुंबई

## अभिनंदनीय

बंगलोर येथे मागील महिन्यात 'रंगदक्षिणी' एकांकिका स्पर्धा महाराष्ट्र मंडळाने आयोजित केल्या होत्या. बंगलोरच्या या 'नावारुपाला' आलेल्या एकांकिका स्पर्धेत सोलापूर येथील 'जवळिक' नाट्यसंस्थेचे सर्वेसर्वा असलेल्या श्री.शशीकांत लावणीस यांना दिग्दशर्नाचे पहिले पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नारायण सुर्वे यांच्या 'तुमचंच नांव लीवा की मास्तर' या कवितेवर आधारित 'नांव' या एकांकिकेसाठी त्यांना हे पारितोषिक देण्यात आले. एकूण 'सहा' पारितोषिकांनी 'नांव' एकांकिकेला सन्मानित करण्यात आले. 'नाट्यमंदार' या पुरस्काराने नाट्यपरिषद, मुंबई शाखेतर्फे श्री.लावणीस यांना नुकतेच गौरविण्यात आले होते. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, पुढारी या मुंबईच्या वृत्तपत्रांनी याची दखल घेतली होती. नाट्यक्षेत्रातील या विशेष पुरस्कारांबद्दल श्री.शशीकांत लावणीस यांचे असोसिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन !

– सेक्रेटरी

## *असं होतं*

असं होतं आमच्यावेळी
आमच्यावेळी तसं नव्हतं
तेच ते अन् तेच ते
पकावली पोरं
सगेसोयरेही वैतागले सारे ।।

एक मात्र खरं होतं
देवा शपथ अगदी खरं
कधीच कोणाला नाही सांगितलं
कारण ते प्रेम होतं. ।।

पावसात भिजण्यावर
सायकलच्या रपेटवर
सिगरेटच्या वलयांवर
आणि हो,
मस्त मस्त वाटणाऱ्या
चहाच्या घोटावरही
तेच ते प्रेम होतं ।।

छान, सुरेख, सुंदर, मस्त
हेच होते शब्द फक्त
कधी कसं कुणास ठाऊक
'या' प्रेमाचं 'त्या' प्रेमांत
रूपांतर झालं होतं ।।

आता मात्र जमत नाही
(हेही नाही, ते ही नाही)
जमलं तरी जुळत नाही
कारण आम्ही वृद्ध झालो
(असं लोक म्हणतात!) ।।

– **नी. व. ओढेकर**, नाशिक

## अभिनंदनीय

श्री. वासुदेव मा. चांदोरकर यांची नातवंडे चि. आदित्य राजेश गुंफेकर वय ११ वर्षे व चि. कु. भाग्यश्री राजेश गुंफेकर वय ९ वर्षे ह्या दोघांनाही एशियन मार्शल आर्ट ऑफ असोसिएशनने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये (दिनांक २७/२/२०११) रौप्य पदके मिळाली आहेत. दोघांचे असोसिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन!

– सेक्रेटरी

## On Offside

Rutton was a happy and contented soul. By temperament he was jolly too. And he had every reason to be so. Now fifty-five years of age, the last thirty years he was managing his confectionery place, Jolly Confectioners successfully. Situated at vantage location in the central district of the city, the Jolly Confectioners saw three generations in the business. Established by his grandfather more than fifty years back, the store served three generations of the children from the area with peppermints, toffees, chocolates, etc. A few varieties were grandfather's very own recipes, not available in any other confectionery store in the city. The store was spaciously housed in almost fifteen hundred square feet : a wide frontage which ran deep inside in a narrowish way to house the main store, kitchen , storeroom, restroom with toilet for the owner and a servant room. Attractively stored in glass jars, later in plastic jars, were wide varieties of confectionery items. Rutton added speciality chocolates from European countries like Switzerland, Holland etc. When possible he would import special varieties on an import licence or get them from local importers, many times paying no attention to the cost factor. The store was and had to remain 'something special to him and his young friends'. His regular buys from the European countries earned a special place for him from the manufacturers/dealers from Switzerland. He had a free trip to Switzerland from the Swiss manufacturers for a visit to the manufacturing factories in that country.

Love for chocolates and other confectionery items was not the only reason for Rutton liking the European nations. In fact, more love was for the game of football played in the European countries. Club such as Manchester United, Real madrid, A C Milan were idols for him. A TV set exclusively for him at home and another at the work place, so that he did not miss any major football event. During his Europe tour, he had visited at his cost all the major football centres in England, Germany, France and Italy. It was good for him that while his wife had no love for the game, she did not object to his watching football matches. The daughter, Rose, had taken liking for the game and number of times she watched with daddy the major events on European circuit.

Otherwise too, Rutton had no particular problem at home. Wife Jasmine, though a bit short tempered and always supported the daughter in all her demands, just or otherwise, cooked very well and looked charming and graceful even at the age of fifty.

The shop did good business with hardly any ups and downs in the business. Of course, Rutton was basically a contented man and never thought of handsome increase in turnover and profits. he gave good salary to his limited staff and paid them handsome bonus every year. A really lucky man, Rutton: a successfully running store, a spacious flat, charming wife and a smart and intelligent daughter.

Sunday morning around 11 a.m. Rutton had finished a heavy brunch and was relaxing in his favourite armchair. As he was about to doze, Rose came from inside and said, "Daddy, I have a brilliant plan of a good business venture with sure prospects of handsome gains." "That is good, high time that you take a job or start your own business", replied Rutton in a somewhat sleepish tone. Rose did not notice that he was almost drowsy. In all her youthful exuberance, Rose continued, "You have such a wonderful and spacious place at the store. More than half is unutilized. With a number of malls and special Kids' stores that have sprung up in the last few years, our confectionery store is not growing, the way it should in the fast moving world. I am rather afraid we may go down in business in next few years. I therefore, think that mummy and I will set up an ultra modern beauty parlour in its place. You know daddy, ladies are so conscious these days of hair style, skin care etc., that the beauty parlours are having roaring business. I have already completed a special course in skin care and Ms. Lily, the noted beautician in India has agreed to be consultant to our parlour. I am sure

you will just love the proposal". "Certainly not!", exclaimed Rutton. "The store is doing good business and is there from my grandfather's time. Like the companies at the stock market, the store may not be showing up doubling of turnover and profit every year, but we are doing pretty well. I am still capable of working eight to ten hours a day. Sorry, I just cannot like your proposal. You may please look for some other place for the parlour." "Oh daddy, you just don't understand the strategic location of the store and the large unutilized place there. in the real estate market the place will command high premium," replied Rose. Continuing further she said, "we are comfortable financially, but nothing much to glory about. Today everybody looks for enhancing the value of his/ her assets. I am sorry to say dad, that in today's world and, talking in football parlance, you are on Offside. Rutton infact enjoyed and liked the argument put forward by Rose. He said to himself, 'Rose can be a good lawyer'. However, he was deeply hurt by her remark that he was being on offside in today's business world. Visibly annoyed he retorted, "Me, on offside. just impossible. Last thirty years I have run the store successfully with not a single year of loss and earned a name in the business. There will not be any employer who pays handsome bonus to his staff every year. I am not on offside. Those who are at the backfield can never be on offside. Also the offside player does not get a Red Card. In my whole life I did not get a Red Card from the Customs or the Income-tax dept. Sensing his peevish tone, Rose left telling him that they would discuss the matter some other time.

Rose had left, but her remarks made Rutton to think seriously on her remarks and what he achieved in the business in the last thirty years. He was now in a reflective mood of self-introspection. The business was already there from the grandfather's time. The excellent location and spacious accommodation too were due to grandfather's foresight. Rutton's contribution of storing special imported varieties of chocolates and setting up an icecream parlour at the store were definitely attractive additions. His affable and jolly nature made him very popular among the kids visiting the store. But he now realized, as Rose had said, he never had a serious look at the business enviornment around. The new kids stores and corners at Malls had become very popular with the children and in the years to come, his business may really go down. if one has to survive in the business on a strong foot, the person has to be pragmatic and forward looking. Rose was right. He had become an offside player in the days of globalization and competition.

He had a short nap and, thereafter, he continued to brood on the subject. Somewhere around 7 p.m. in the evening, he came to a really good solution which should be acceptable to Rose. Rose will have about one thousand sq. ft. area for the parlour and in the remaining three hundred sq. ft., he will have a totally new look confectionery store with focus on changing likes and demands of kids. Furthermore, he would now be a complete businessman. Rose and her mother will have to pay atleast fifty percent of the market value of the place, which would be given to them.

He liked the proposal so much, he called Rose back home on mobile. Rose and Jasmine, liked the proposal but not the idea of paying fifty percent of the market price. Ultimately the business deal was struck at the thirty percent, when Rutton told them that he would have to pay generous retirement benefits to four or five of his staff members and further that he would have to spend lavishly to turn the store in a total new look Joy Corner.

The next six months, Rose, Jasmine and Rutton were totally involved in setting up the Parlour and the new look store. All were moving forward in an orderly and planned manner, with a view to meeting the deadline set by them. Now onwards, none would be on offside.

***- S. Chandurkar,***
***Bandra (E), Mumbai-51***

## सहकारभूषण श्री. वि. पु. भावे

आपल्या संघटनेचे माजी सचिव श्री.विजय पु. भावे यांना नुकतेच कोल्हापूर येथील वुमन्स डेव्हलपमेंट एज्युकेशन ॲन्ड पब्लिक वेलफेअर या संस्थेने 'सहकार भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले. निवृत्त एअर मार्शल श्री.भूषण गोखले यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

श्री. भावे साहेब तसे सुपरिचित व्यक्तिमत्त्व. कोकणातल्या राजापूर, जि. रत्नागिरी येथे जन्म. तेथेच माध्यमिक शालान्त शिक्षण पूर्ण केल्यावर १९६१ मध्ये पुण्याला फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश. १९६५ मध्ये बी.ए. (इंग्लिश) झाल्यावर १९६६ मध्ये स्टेट बँकेत प्रवेश. १९७२-७३ मध्ये C.A.I.I.B. झाल्यावर १९७४ मध्ये ट्रेनी ऑफिसर म्हणून निवड. इतर विविध ठिकाणी विविध पदावर कामे करून व्यवस्थापनाचा बराच अनुभव मिळाल्यावर १९९४ मध्ये मध्यवर्ती कार्यालय, मुंबईला कार्मिक विभागात ए.जी.एम. (इस्टेट) झाले व तिथेच केडर मॅनेजमेंट डिपार्टमेंटला काम करताना संपूर्ण भारत पहाण्याची संधी मिळाली आणि शेवटी सहाय्यक महाव्यवस्थापक पदावरून २००१ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. हा झाला स्टेट बँकेतील कामाचा धावता आढावा.

२००१ मध्ये निवृत्ती घेतली तरीही अजून किमान ४ वर्षे तडफेची, उमेदीची शिल्लक होती. शिवाय संघसंस्कारांचा परिणाम म्हणून सेवाभाव होताच. स्वस्थ बसून राहणे भावेंना शक्य नव्हते. शिवाय त्यांच्या कार्यकुशलतेवर काही संघटनांचा डोळा होताच. परिणामी प्रथम रा.स्व.संघ प्रणित जनकल्याण समितीच्या रक्तपेढीचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले. ते त्यांनी २ वर्षे केले. पुढे गाजलेल्या माधोपुरा सहकारी बँकेमुळे, सहकारी बँकांकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टीकोन बदललेला होता. वातावरण असुरक्षिततेचे आणि अतिशय संशयाचे होते. ते लोण पुण्यात पोहोचले होते. पुणे जनता सहकारी बँकेचा तोटा १३० कोटीपर्यंत पोहोचला होता. रिझर्व बँकेने 'एक्सपर्ट डायरेक्टर नेमा' असा तगादा लावला होता. अशावेळी रक्त जमा करण्याऐवजी रक्त आटविणारी कामगिरी करून दाखविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने भावे साहेबांवर सोपविण्यात आली. आवाहन मोठे होते हे खरेच. पण संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सक्रीय पाठिंब्याच्या बळावर भावे साहेबांनी ते पेलले आणि दोन वर्षात ६० कोटीची कॅश रिकव्हरी करून दाखवून सर्वांचा आत्मविश्वास वाढविला. परिणामी आता ही बँक १२ वर्षानंतर भागधारकांना डिव्हीडंड (लाभांश) देण्याच्या स्थितीला पोहोचली आहे. त्वरित निर्णय घेऊन जलद अंमलबजावणी केल्याचे फायदे ग्राहकांना, कर्जदारांना तर मिळालेच, आपल्या पदाचा अभिमान न बाळगता सर्वांच्या उचित सल्ल्याचा स्वीकार करणे हे केल्याने स्टाफचीही मनोवृत्ती बदलत गेली. शिवाय रिझर्व्ह बँकेचीही सक्रीय सहानुभूती वाढतच गेली. भागधारकांना लाभांश हवा, कर्मचारी वर्गाला पगारवाढ हवी यात गैर काय? पण परिस्थिती पाहून सर्वांनीच धीराने घेतले. अर्थात भावे साहेब हे श्रेय आपल्या एकट्याचे असे कधीच मानत नाहीत. स्टेट बँकेची कार्यपद्धती आणि सहकारी बँकेची कार्यपद्धती भिन्न. (इथेतर थेट शिव्याशाप ऐकण्याची तयारी ठेवावी लागते.) तरीपण प्रशासन सुधारणेबरोबरच लोकाभिमुख राहण्यासाठी जुन्नर, ओतूर, रत्नागिरी भागात छोटी छोटी शेतीकर्जे देण्याचा उपयोग केला आणि तो यशस्वी झाला.

'विना सहकार नहीं उद्धार' ही झाली घोषणा. पण प्रत्यक्ष सहकार्य ही झाली कृती. 'सहकार' या शब्दाचा एक अर्थ आंबा असा आहे. मधुर फळे आपोआप थोडीच मिळणार? त्याला मशागत आहे, खतपाणी आहे, वृक्षतोडी पासून जपणे आहे. निवृत्तीनंतर केवळ विश्रांतीच न घेता आपल्या अनुभवाचा लाभ सहकारी बँकेच्या माध्यमातून जनता जनार्दनाला देणाऱ्या भावे साहेबांना 'सहकार भूषण' पुरस्कार लाभणे ही उचित आणि अभिनंदनीय घटना आहे.

''शरीर परोपकारी लावावे। बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडो नेदावे। कोणी येकाचे ।।''

या समर्थ वचनाचे येथे स्मरण झाल्यास आश्चर्य नाही.

– श्री.श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे, पुणे

## मन

मन म्हणजे आपल्या विचारांचे प्रतिबिंब ।
असे की श्रावणातल्या पहिल्या पावसातील भिजणं ओलंचिंब ।
मन म्हणजे वळणावळणाचा निसरडा रस्ता ।
त्यातून चालत असताना खाव्या लागतात मोठ्या खस्ता ।
मन म्हणजे गार वाऱ्यात डुलणारे उंच झोके ।
त्यावर जडलेलेअसतात आपले हृदयाचे ठोके ।
मन म्हणजे बेधुंद लाटांची लहर ।
त्याला असते नक्षीदार शंख शिंपल्याची झालर ।
मन म्हणजे असतो आठवणींचा चुडा ।
जसा की सुगंधी मंत्रमुग्ध करणारा फुलांचा सडा ।
मन म्हणजे भिंतीतील नाजूक शिल्पकाय ।
त्याप्रमाणे आपण मनाशी केलेले असतात निश्चय ठाम ।
मन म्हणजे सुखदु:खाचे तरंग अपार ।
त्याच परीक्षा पार करत जायचे असते समुद्रापार ।
मन म्हणजे अमर्याद आशा आकांक्षाचा सागर ।
असे की तिन्ही ऋतून फुलणारी पांढरीशुभ्र नजर ।
मन म्हणजे निर्मल खळखळते पाटाचे पाणी ।
त्याच ठिकाणी म्हटली जातात आयुष्याची गोड गाणी ।।

– शरयु अरविंद कुलकर्णी, कोल्हापूर
भ्रमणध्वनी – ९८८१३०२००५

लघुकथा

# ...आणि कळी फुललीच नाही

आज सकाळी प्रशांतचा फोन आल्यापासून शोभाताईंचे कामात लक्षच लागत नव्हते. प्रीतीचे दिवस भरले होते आणि पहाटेच तिला तिच्या मोठ्या बहिणीच्या स्वातीच्या 'चिरायु' मॅटर्निटी होममध्ये ॲडमिट केले होते. प्रीतीची तब्येतही व्यवस्थित होती. नॉर्मल डिलिव्हरी होईल असे स्वातीचे मत होते आणि प्रीतीही काही कौतुकाचं माडगं होऊन नुसतीच बसून रहात नव्हती. शैलाताईंना तिच्या आईला जमेल तेवढी मदत करत होती. सकस व चौरस आहार घेत होती. फळे खात होती. संध्याकाळी तासभर फिरूनही येत होती. तशा तिच्या खाण्यापिण्याच्या काही खोडीही नव्हत्या. औषधं-टॉनिक्सही वेळेवर घेत होतीच. तसे चिंतेचे काहीच कारण नव्हते. परंतु शोभाताईंचा स्वभाव फारच हळवा. त्यामुळे त्यांना उगीचच काळजी लागून राहिली होती.

अशाच तंद्रीत त्यांनी कुकर लावला. तांदूळ मटकीचे मोड आणि मूगाची डाळ कुकरला लावली. आता शिट्टी होणार एवढ्यात त्यांना आठवले आपण तूरडाळी ऐवजी मूगाची डाळ कुकरमध्ये लावली. शरदरावांना तर मूगडाळ अजिबात आवडत नव्हती. मूगडाळीचे वरण त्यांना आजारी माणसाचे जेवण वाटत होते. पण आज शोभाताईंचे मनच थाऱ्यावर नव्हते. शरदरावांच्या मुलूख मैदान तोफेला तोंड द्यायची त्यांनी तयारी ठेवली. मिक्सरमधून ओल्या खोबऱ्याची चटणी काढली. कुकर झाल्यावर उसळ, आमटी केली. ५-६ पोळ्या केल्या कोशिंबिरीसाठी फ्रिजमधून काकडी काढली. पण नंतर त्यांनी तो बेत कॅन्सल केला. नाहीतरी शरदरावांना कोशिंबीर आवडत नव्हतीच. टेबलावर त्यांचे पान वाढून त्यांना बोलवायला त्या बाहेर गेल्या. आराम खुर्चीत बसून पेपर वाचनात शरदरावांची समाधी लागली होती. काय मूर्ख बायको आहेस असा तिरस्कार युक्त कटाक्ष टाकत त्यांनी पेपर टिपॉयवर ठेवला आणि टेबलावर येऊन बसले. मूगाच्या वरणाची वाटी त्यांनी बाजूला ठेवली व फ्रिजमधली कढी घेऊन गरम करून कढीशी जेवले. शरदरावांनी शिळ्या कढीला उत आणला तसा बोलण्यालाही उत आणला. पण शोभाताईंना आज त्याचे विशेष वाटले नाही. आज त्यांचेच मन थाऱ्यावर नव्हते. जेवण झाल्यावर शरदराव पुनश्च पेपर वाचनात समाधिस्थ झाले. शोभाताईंना प्रीतीच्या काळजीमुळे जेवावेसेच वाटेना. त्या आपल्या देवाजवळ पाट टाकून जप करत बसल्या. पण कान मात्र फोनच्या रिंगकडेच लागलेले होते.

पंचवीस वर्षांपूर्वी कुलकर्ण्यांची शरयु शोभा बनून उंबरठ्यावरचे माप ओलांडून देशपांड्यांच्या घरी आली. देशपांड्यांचा शरद तसा अहमन्य आणि अरेरावीच होता. पण खातं-पितं घर होतं. सरकारी नोकरी होती. तिचे सासरे अप्पा 'देवमाणूस' होते. त्यांना गावात मानही होता. म्हणून तिच्या दादांनी हे स्थळ नक्की केले. पण सासुबाई.. न बोललेलेच बरे.

नव्याचे नऊ दिवस संपले आणि सासुबाईंनी एकेक रंग दाखवायला सुरूवात केली. पिढीजात भाऊबंदकी असलेल्या घरातून सावेकरांच्या घरातून त्या आल्या होत्या. त्यांचीच चुलत बहीण त्यांच्या धाकट्या दिराची बायको म्हणून भाऊबंदकी पुढे चालवायला देशपांड्यांच्या घरी आली होती. एकदा सासुबाईच्या गोदावरी आत्या आणि काशिनाथमामा आले असताना आत्या सांगत होत्या, 'तरी मी रघुनाथला सांगत होते, त्या घरी पुन्हा विमलला देऊ नकोस. पण माझं मेलीचं कोण ऐकतयं?' भावांच्या आश्रयाला आलेली मी. आश्रिताला मत नसते. कमल ही अशी विमल ही तशी. आडवा विस्तव जात नाही दोघींमधून. पण आमचे दोन्ही जावई अप्पा आणि अण्णा मात्र समजूतदार हं. म्हणून संसार निभावला. नाहीतर दोघींच्याही नांदण्याचे चांदणे झाले असते.

शोभाताईंच्या सासुबाईंना लागोपाठ चार मुली तर विमल काकूंना तिन्ही मुलगेच. सासुबाई बाळंतीण झाल्या की विमल काकू 'मुलगी झाली हो' म्हणून शेजारी पाजारी कुचेष्टा करायच्या. ह्यांच्या वेळी गरोदर असताना सासुबाई रोज गणपतीला जायच्या, तेव्हा मानभावीपणे म्हणायच्या, "कमलताई आता मात्र मुलगा होऊ दे हं! नाही तर पुढच्या वेळी आणखी दुसऱ्या एखाद्या देवाला जायला लागेल. वन्स ह्यांना पंचपाळं म्हणायच्या. ह्यांना ते आवडायचे नाही. विमलकाकूंना मग ते अद्वातद्वा बोलायचे. आगीत तेल ओतायला सासुबाई आणि वन्स. यांचं भांडण मिटवताना अप्पा आणि अण्णांच्या नाकी नऊ यायचे. सासुबाईंची 'मुलूख मैदान' तोफ बरसायची. सुना येऊ देत म्हणजे कळेल इंगा. नाही तुम्हा दोघांना काशीयात्रेला पाठवलं तर नाव बदलं हं माझं विमल! चुलत दीर मात्र देवगुणाचे होते. लहान होते तोपर्यंत अप्पा आणि अण्णांच्या मागे लपून मोठ्या चुलत भावाबहिणीचा आणि काकू उर्फ मावशीचा तमाशा बघत मोठी झाल्यावर आपल्या आईला ढकलत ढकलत घरात घेऊन जात.

अशीच वर्षामागून वर्ष उलटली. नव्या सुना घरी आल्या. परंतु पहिले पाढे पंचावन्न. दोन्ही जावांमधून विस्तव जात नव्हता. सासुबाई विमल काकूंच्या सुनांना फितवू पहात होत्या. मधली चुलत जाऊ विनिता जरा हलक्या कानाची होती. तिला सासुबाई म्हणायच्या, "काय गं विनिता! हडकली आहेस अगदी. तुझी सासुबाई पोटभर जेवायला वाढते ना? मान बघ किती निघाली

आहे तुझी.'' विनिताला ह्या खोट्या उमाळ्याने गहिवरून यायचे. म्हणायची, ''बघा ना काकू! मोठ्या नि धाकट्या जाऊबाई सासुबाईंच्या नात्यातल्या, म्हणून त्या दोघी लाडक्या, शिवाय श्रीमंत घरातल्या. त्यांना कामाची सवय नाही. मी गरीबाघरची म्हणून ह्यांच्या घरी पोटावारी राबते आहे. माझ्या माहेरच्या माणसांनी आधणात तांदूळ वैरावे तशी वैरली मला ह्यांच्या घरात'' आणि डोळ्यांना पदर लावायची. सासुबाईंना मात्र आनंदाच्या उकळ्या फुटायच्या. पण तसं न दाखवता त्या आणखी तिला हरभऱ्याच्या झाडावर चढवायच्या.

शोभाताई मात्र सगळ्यांशी चांगलं वागायच्या, त्या मुळातच उजू-रूजू होत्या. सासुबाई, शरदराव ह्यांच्याबरोबर जुळवून घेता घेता त्यांना तारेवरची कसरत करावी लागत होती. त्यात माहेर वाशिणीची भर. पण अप्पा त्यांच्या मागे खंबीरपणे उभे होते. एखादा पदार्थ बिघडला तर सासुबाई म्हणायच्या, ''हेच का तुझ्या आईने शिकवले?'' त्यावर अप्पा म्हणायचे, ''तुम्ही काही झाडावर पिकून आला नव्हतात. इथे आल्यावर आईनेच शिकविले व्यवस्थित स्वयंपाक करायला. आता सुनेसमोर नाकाने कांदे सोलू नका.'' शोभाताईंना हसू यायचे. पण हसावे तर पंचाईत, आणखी भडका उडायचा.

अशात शोभाताईंना दिवस गेले. खूपच त्रास होत होता. पाणीसुद्धा पचत नव्हते. सारख्या उलट्या. अगदीच गळून गेल्या होत्या त्या. दादा आईला कळल्यावर त्यांना माहेरी नेण्यासाठी दोघेही स्पेशल गाडी करून आले. आई म्हणाली, ''शरयुला घेऊन जातो आम्ही. डोहाळे निवळेपर्यंत. फारच अशक्त झाली आहे ती.'' सासुबाई लगेच फणकारल्या ''काही नको न्यायला. जगावेगळे हिलाच डोहाळे लागले आहेत काय? जेवढे अंग मोडून काम करेल तेवढे बाळंतपण सोपे होईल. नाही तर आहेच सिझर. आल्यागेल्याचं घर आणि मला होतंय कुठे आताशा. त्यातून आता शाळांना सुट्ट्या लागतील. मुली नातवंड यायची आहेत.'' फार हिरमोड झाला शोभाताईंचा. दादा-आईही एवढंस तोंड करून परत गेले.

शोभाताईंना चौथा महिना लागला आणि शाळांना सुट्ट्याही लागल्या. माहेरवाशीणी मुलांना घेऊन माहेरपणाला आल्या. सर्वाचं करता करता शोभाताई दमून जायच्या. पण सासुबाई, वन्स आणि शरदराव डोक्याला डोकी लावून बसायचे. त्यांचा काय खल चालायचा ते काही शोभाताईंना कळायचे नाही. अजून त्यांना डॉक्टरांच्याकडेही ट्रिटमेंटसाठी नेले नव्हते. एके दिवशी मंदावन्स म्हणाल्या, ''शोभा आज डॉक्टर पाटसकरांच्याकडे जायचे आहे तपासणीसाठी'' शोभाताईंनी मानेनेच होकार दिला.

चार वाजता मंदा वन्स व शोभाताई डॉक्टर अनुराधा पाटसकरांच्याकडे गेल्या. डॉक्टरांनी व्यवस्थितपणे तपासले. बाळाची वाढ चौथ्या महिन्याच्या मानाने कमी आहे. आपण सोनोग्राफी करून बघू. सोनोग्राफी केली गेली. डॉक्टर म्हणाल्या, ''बेबीची वाढ कमी आहे, पण अजूनी वेळ गेलेली नाही. सकस आणि चौरस आहार, पुरेशी विश्रांती आणि औषधी, टॉनिक्स चालू केली की, बेबीची वाढ चांगली होईल. काळजीचे काही कारण नाही. तुम्ही उगीच टेन्शन घेऊ नका. प्रेगन्सी पिरीयडमध्ये आईने आनंदी रहायला हवे. बेबी चांगली हेल्दी झाली पाहिजे.''

पण सासुबाईंच्या मनात काय आले, कसे आले कोण जाणे. त्या एकदम म्हणाल्या, ''मंदा असं का करीनास, आपण हिची गर्भजल परीक्षा करून घेऊ.'' शोभाताई मनोमन चरकल्याच. त्या मोठ्या धीराने म्हणाल्या, ''पहिलीच वेळ आहे. मुलगा-मुलगी काही का होईना. हाती-पायी सुखरूप सुटले म्हणजे झाले.'' ''ते काही नाही. तू गर्भजल परीक्षा करून घेच'' शरदराव कडाकडले. शोभाताईंनी मोठ्या केविलवाण्या नजरेने शरदरावांकडे पाहिले. ''मंदा तू तिला घेऊन जाच.'' शोभाताई काकुळतीने म्हणाल्या, ''गर्भामध्ये काही व्यंग आहे का हे पहाण्यासाठी असते ना! मी सांगते देवाच्या कृपेने बाळ अगदी निकोप असेल. थोडी विश्रांती मिळाली, सकस-चौरस आहार घेतला की, बाळाची वाढ चांगली होईल. मी सातव्या महिन्यातच माहेरी जाईन म्हणजे मला विश्रांतीही मिळेल.'' ''ते काही नाही. तुला गर्भजल परीक्षा करून घ्यावीच लागेल. मंदा तू आजच तिला घेऊन जा.'' सासुबाईंनीही शरदरावांचीच री ओढली.

अखेर शोभाताईंचा विरोध लटका पडला. रिपोर्ट आला. मुलगी आहे हे ऐकून मंदावन्सचा चेहरा पडला. घरी आल्या आल्या मुलगी होणार हो असे जाहीर करून टाकले. सासूबाई तर फारच हिरमुसल्या. शोभाताईंच्या उरात तर धडकीच भरली. मुली, सासुबाई आणि शरदराव यांचा बराच वेळ काथ्याकूट चालला होता. अप्पांना व शोभाताईंना कुणीच विचारात घेतले नाही.

दुसरे दिवशी सासुबाई म्हणाल्या, ''शोभा ॲबॉर्शन करून घे. वाढही कमी आहे असे म्हणतात डॉक्टर आणि मुलगीच आहे. तुला जर मुलगी झाली तर त्या विमलला हर्षवायूच होईल. ते काही नाही तू ॲबॉर्शन करून घे.'' हे ऐकले मात्र शोभाताईंच्या अंगावर भीतीने सरकन् काटाच आला. तोंड कोरडे पडले. त्या मटकन् खालीच बसल्या. पण लगेच सावरल्या.

सगळा धीर एकवटून त्या म्हणाल्या, ''नाही मी ॲबॉर्शन करून घेणार नाही. मी माहेरी जाईन तेथे मला विश्रांती मिळेल. बाळाची वाढही चांगली होईल. पण मी ॲबॉर्शन करून घेणार नाही, नाही म्हणजे नाही. हे ऐकून शरदराव एकदम आत आले व शोभाताईंच्या फाडकन् मुस्कटात मारली. ''आई सांगते ते मुकाट्याने ऐक. नाहीतर परिणाम चांगला होणार नाही.'' शोभाताई रडत रडत म्हणत होत्या. ''नका हो असे करू. हे आपले पहिले वहिले मूल आहे. मुलगी असती म्हणून काय झाले.'' असे म्हणून त्या तेथून उठून जाऊ लागल्या. तोच शरदरावांनी त्यांच्या कमरेत सणसणून लाथ घातली. शोभाताई धाडकन् पोटावर पडल्या. पोटातून जीवघेण्या कळा सुरू झाल्या आणि व्हायचे तेच झाले ''आणि कळी फुललीच नाही.'' शोभाताईंनी पुष्कळ शोक केला. पण शेवटी ते अरण्य रूदनच ठरले. बाकी सगळ्यांच्या मनासारखे झाले होते ना! अप्पांनी मात्र काय तो धीर दिला. सासुबाईंचे न ऐकता दादा आई तिला माहेरी घेऊन गेले. करतात काय बिचारे. दगडाखाली हात सापडला होता ना!

अशीच दोन वर्षे गेली आणि प्रशांतचा जन्म झाला. तेव्हा सासुबाईंना जग जिंकल्याचा आनंद झाला. मोठ्या दणक्यात बारसे झाले. तेव्हाच सासुबाईंनी जाहीर करून टाकले. ''आता पुन्हा चान्स घेऊ नका. मला काही आता बाळंतपण करणं होणार नाही.'' शरदरावांच्या हेकेखोरपणामुळे एकुलता एकच राहिला. राखी पौर्णिमा, भाऊबीज आली म्हणजे हिरमुसला व्हायचा. पण अभ्यासात एकदम हुषार. खेळातही नेहमी नंबर वन. दहावी-बारावी-सीइटी पार करत सॉफ्टवेअर इंजिनिअर झाला. प्रीतीही सॉफ्टवेअर इंजिनियर. शरदरावांनी या लग्नाला खूप विरोध केला पण प्रशांतपुढे त्यांचे काही चालले नाही आणि आता प्रीती आई होणार होती. हातातल्या माळेचे मणी पुढे पुढे सरकत होते आणि त्याचे विचारही.

एवढ्यात फोनची रिंग वाजली. शोभाताई हातात माळ घेऊन फोनकडे धावल्या. तिकडून आनंद भरल्या आवाजात प्रशांत गात होता. ''मेरे घर आयी एक नन्ही परी अगं आई प्रीतीची डिलीव्हरी नॉर्मल झाली. थोडा त्रास झाला. पण आता बाळ-बाळंतीण ठीक आहेत. मुलगी अगदी प्रीतीसारखी आहे. गोरीपान, कुरळ्या कुरळ्या केसांची. हेल्दी. कधी येतेस मग नातीला बघायला?'' हे ऐकले मात्र शोभाताई भरून पावल्या. डोळ्यातले आनंदाश्रू पुसतच त्यांची पावले देवघराकडे वळली. समई लावूनच देवापुढे साखर ठेवण्यासाठी.

- सुगंधा रामचंद्र जोशी, सातारा

## मंत्री सांगा कुणाचे?

ल ला लला ललला
ल ला लला ललला

मंत्री, सांगा कुणाचे?
मंत्री, माझ्या देशाचे
देश, सांगा कुणाचा?
देश, माझ्या मंत्र्यांचा

केवढ्या मोठ्या बंगल्यात!
मंत्री-मंत्रीण राहतात
मंत्री-मंत्रीण अन् भवती
चमचें, त्यांचे भिरभिरती

शासन करीती देशावरी
मंत्र्यांना भ्रष्टाचार प्रिय भारी
चोराने चोरांची साथ घ्यावी
स्वार्थाने, स्वार्थाला साक्ष द्यावी

चोरीत चोर ते मिळताना
हासते, नाचते राष्ट्र सारे
ल ला लला ललला
ल ला लला ललला

- अरूण भट, बदलापूर (पूर्व)
९३२४५५८०५१

## अभिनंदनीय

आपले अमळनेर जि.जळगांव येथील सदस्य श्री.केदार ब्रह्मे यांचे चिरंजीव प्रा.गौतम ब्रह्मे यांनी मराठी भाषा विषयात अत्युच्च प्राविण्य प्राप्त केलेले आहे. ह्या विषयात ते राष्ट्रीय पातळीवरील तज्ञ समजले जातात. देशात अनेक ठिकाणी होत असलेल्या विविध संशोधनात्मक परिसंवादात त्यांचा सहभाग असतो. महाराष्ट्रातील विद्यापीठांव्यतिरिक्त म्हैसूर, बडोदे इ. विद्यापीठातही त्यांनी शोध निबंध सादर करून चर्चासत्रात भाग घेतला आहे.

Peoples Linguistic Survey of India या राष्ट्रीय कार्यशाळेत मराठी विषयातील तज्ञ म्हणून त्यांचा सहभाग असतो.

त्यांना भविष्यकाळातील कार्यासाठी असोसिएशनच्या शुभेच्छा!

- सेक्रेटरी

## एका नोटेचे आत्मवृत्त

माझा जन्म नाशिक येथील Security Press मध्ये झाला. नाशिक म्हणजे प्रभू रामचंद्रांच्या वास्तव्याने पुनीत झालेले एक तीर्थक्षेत्र. माझी ओळख, माझा रंग किंचित हिरवट, १०० चा आकडा भारतीय रिझर्व बँकेचे नाव, १५ भारतीय भाषेत लिहिलेले शंभर रूपये ठळक इंग्रजीत One hundred Rupees व हिंदीत 'एक सौ रूपये' मागील बाजूला हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे, केंद्रीय सरकार द्वारा प्रत्याभूत. धारकास शंभर रूपये देण्याचे R.B.I. Governor चे वचन व त्याखाली त्यांची सही R.B.I. सिंहाची खूण. सत्यमेव जयतेचे तीन सिंह. लाल इंग्रजी आकड्यात माझा नंबर. हिरवा तुटक असा एक Security Thread. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपिता म. गांधींचे निर्व्याज हास्य दाखविणारे चित्र. काही लोक माझा 'एक हिरवी पत्ती' असाही उल्लेख करतात. तो जरी कोडवर्ड होता तरी तो आता सर्वांना माहीत आहे. तसे आता आणखी नवीन कोडवर्ड मी ऐकले आहेत ते म्हणजे, एक लाख रूपये असलेल्या बॅगेला 'एक पेटी' म्हणतात व एक कोटी रूपये असलेल्या मोठ्या बॅगेला 'खोका' असे म्हणतात. असो.

नाशिक येथून मी माझ्या असंख्य सख्यांसोबत आधी पॅकेट व नंतर गठ्ठा अशा रूपात एका मोठ्या खोक्यात बंद होऊन, पोलीस बंदोबस्तात आम्ही सर्व पुणे येथे एका राष्ट्रीकृत बँकेच्या शाखेत आलो. तेथे अनेक दिवस तिजोरीत नुसते पडून होतो. शक्य तो वापरात असलेल्या नोटा आधी बाहेर जात येत होत्या. त्यातून काही अगदीच जीर्ण असल्यास त्यांना वेगळ्या कपाटात ठेवले जात असे. त्यांना Soiled Notes असे वेगळे नाव होते. नंतर नागपूरला नेऊन त्यांचे दहन करतात असे म्हणतात.

एके दिवशी एका बिल्डरच्या पेमेंटमधून मी इतरांसोबत त्याच्या मोठ्या बॅगेत जाऊन बसले. घरी ते त्याने विभागून काही पाकिटातून बंद करून ठेवले. दुसऱ्या दिवशी एक पाकीट त्याने कार्पोरेशनच्या एका अधिकाऱ्याच्या उघड्या ड्रॉवरमध्ये टाकले, तेव्हा त्या बिचाऱ्या अधिकाऱ्याने आम्हाला हातही लावला नाही. त्याने बिल्डरला फक्त आकडा विचारला व समाधानाने एक फाईल सही करून बिल्डरला दिली. नंतर संध्याकाळी ब्रिफकेसमधून मी त्या अधिकाऱ्याच्या घरी गेले. त्याने मला गादीखाली कॉटमधील गुप्त कप्प्यात कोंबले. तेथे इतरही हजार हजार/पाच-पाचचेशी पाकीटं दाटीवाटीने ठेवलेली होती. काही दिवस त्या गर्दीत काढल्यानंतर त्या अधिकाऱ्याने मला काही पाकीटांसोबत एका कार्पोरेटरला हिस्सा म्हणून दिले. काही दिवस कार्पोरेटरच्या घरी आराम केला. त्याने त्याच्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांना वाटण्यासाठी मला बाहेर काढले. इतर पाच भगिनींसोबत मी एका रिक्षावाल्याच्या खिशात जावून बसले. त्याच्या खिशात गुटक्यांच्या पुडीसोबत काही वेळ मला काढावा लागला. त्याने त्याच्या मित्रांना मोबाईल लावला व आज खिसा गरम आहे. संध्याकाळी भेटा. संध्याकाळी Bear Bar मध्ये त्यांची छान पार्टी झाली व मी Bear Bar च्या गल्ल्यात विसावले.

१/२ दिवसांनी कोणत्यातरी उत्सव करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मंडळ बारमध्ये शिरले व त्यांनी रू. १०००/- ची वर्गणीची पावती बार मालकाला न विचारताच फाडली व त्याच्या हातात टिकवली त्याचा नाईलाज होता. न देऊन करतो काय?

मग मी काही दिवस कार्यकर्त्याच्या खिशात राहिले. त्याने मग मोटर सायकलीत पेट्रोल भरताना मला पेट्रोल बिलापोटी पेट्रोल पंपावर दिले. आता माझ्या अंगाला विविध प्रकारचे वास सुटायला लागले होते व घड्याही पडायला लागल्या होत्या. पेट्रोल पंपाच्या बँकेतील भरणा म्हणून मी पुन्हा बँकेच्या तिजोरीत परंतु Issuable च्या कपाटात जाऊन थांबले. तेथे बरीच विश्रांती मिळाली.

नंतर एका पेमेंटद्वारे मी एका फॅक्टरीत व तेथून पगारापोटी इतर ५० जणींसोबत एका मजूराच्या खिशात गेले. हा मजूर मात्र मला खूप सज्जन भेटला. घरी गेल्यावर त्याने बायकोच्या हाती आम्हाला सोपविले व तो टाळ गळ्यात घेवून गल्लीतल्या विठ्ठल मंदिरात भजनी मंडळात जाऊन बसला. त्याच्या कारभारीणीने आम्हाला हातात घेतले आधी स्वत:च्या कपाळी लावले व देवापुढे थोडावेळ ठेवले. त्यातल्या पाच नोटा तिने आधी वेगळ्या डब्यात ठेवल्या व बाकीच्यांचा महिन्यांचा हिशेब म्हणजे कोणाची देणी किती किती द्यायची याचा ताळमेळ लावित बसली. त्या डब्यात आधीही काही नोटा होत्या. काही महिन्यांनी त्या डब्यात साठविलेल्या रकमेसोबत तिने मुलाच्या शाळा प्रवेशासाठी Donations म्हणून एका खाजगी प्रा. शाळेत भरले. तेथील कर्मचाऱ्याने दिवस अखेर आलेले सर्व Donations शाळा संचालक यांचे घरी संध्याकाळी नेऊन दिले. ते शिक्षण संचालक पूर्वी राजकारणात होते तेव्हा त्यांनी अनेक सरकारी भूखंड बळकावून, लोकांकडून डोनेशन गोळा करून, शिक्षक वर्गाच्या पगारातून पैसे कापून, बालवाडी ते एम.बी.ए. पर्यंत अनेक शाळा-कॉलेजेस् उघडली होती व आता मिळत असलेल्या Donations वर त्यांचे उर्वरित जीवन व्यवस्थित चालू होते. त्यांनी त्यांच्या पुढील पिढ्यांची उत्तम व्यवस्था करून ठेवलेली होती. काही दिवस त्यांच्या तिजोरीत विसावल्यावर एकदा त्यांनी त्यांच्या कॉलेजात जाणाऱ्या कन्यकेला पॉकेट मनी म्हणून मला इतर नोटांसोबत दिले. तिने आम्हाला तिच्या छोट्या पर्समध्ये कोंबले. त्या एवढ्याशा जागेत तिने काय काय कोंबले होते, च्युईंगम, चॉकलेट, लिपस्टिक, नेलपेंट, छोटा रूमाल, मोबाईल,

हेअरबॅण्ड, ड्रायव्हींग लायसन्स, क्रेडीट कार्ड, कॉलेजचे आयकार्ड इ. मला तर गुदमरायला होत होते. शिवाय मधून मधून मोबाईलची डायल टोन कानावर आदळत होती.

ती तिच्या स्कूटीवरून भरधाव निघालेली. एका चौकात काय झाले मला कळलेच नाही. ट्रॅफिक मामाने तिला अडविले. तिने सिग्नल तोडला असे वाटते. मामाने तिला बाजूला थांबविले. काहीतरी बोलणी होऊन तिने मला त्याच्या हातात कोंबले. मी त्याच्या खिशात गेले. संध्याकाळी एक वरिष्ठ इन्सपेक्टर डी.एस.पी. साहेबांच्या बंगल्यावर गेला, तेथे डी.एस.पी. साहेबांना पुण्यात चांगले पोस्टींग मिळालेले असल्याने त्यांनी सत्यनारायण घातलेला होता. आता साहेबांच्या घरचा सत्यनारायण म्हटल्यावर इन्सपेक्टरने तेथे मला पूजेमध्ये ठेवले, तेव्हा मला थोडी हळद, थोडे गुलाल-कुंकू चिकटले. थोड्या वेळाने कुणाचे लक्ष नाही असे पाहून, पूजा सांगणाऱ्या भटजींनी मला हळूच बंडीच्या आतल्या खिशात कोंबले. प्रसादाच्या तुपाचा थोडा वास मला यायला लागला. काही दिवस भटजींनी मला जपून ठेवले. नंतर मी एका किराणा दुकानातून होलसेल गुळाच्या व्यापाऱ्याकडे गेले. अंगाला थोडा चिकटपणा चिकटला, मग त्याने मला एका राजकीय पक्षाला देणगी म्हणून दिले. तेथून माझा प्रवास मात्र वेगात सुरू झाला. पक्षाध्यक्ष, मुख्यमंत्री-केंद्रीय मंत्री-पक्षश्रेष्ठी असा पुणे-मुंबई-दिल्ली सुखकर प्रवास करायला मिळाला. नंतर निवडणूका आल्या, एका मतदार संघात मी एका फाटक्या गरीब आदिवासीच्या हाती आले. त्याने त्या दिवशी दिवाळी साजरी केली. दुकानातून रवा, साखर, तूप आणले. मी किराणा दुकानाच्या गल्ल्यात होते तो पर्यंत माझी अवस्था इतकी वाईट झाली होती की मला कोणी हातात घेईनासे झाले. शेवटी मी बँकेतील तिजोरीत Soiled Note च्या कपाटात बंद झाले. आता नागपूर रिझर्व्ह बँकेत दहन होण्यासाठी शेवटचे दिवस मोजत आहे.

- वसंत धुपकर, पुणे
दूरध्वनी : ०२०-२५३१४४७२

## ☺ माझं काम

''कंपार्टमेंटस्मधून कोणीही निष्कारण हिंडू फिरू नका... आपल्या जागेवर बसा.. स्लीपर कोचचा कंडक्टर प्रवाशांना सांगत सांगत डब्यातून फिरत फिरत जाताना माझ्या जवळून गेला... गंमतीने जाताना माझ्याकडे मिष्किलपणे बघत म्हणाला, ''ते काम माझं आहे.''

- मधु रानडे, नाशिक

## काढला संग्रह कवितांचा

*(चाल : 'कानडा राजा पंढरीचा')*

कोणालाही नाही कळला, खर्च फार याचा
काढला संग्रह कवितांचा ।।१।।

मेजावर तो विक्रीस सत्वर
कसा पकडला असा ढीग वर
कुपन ठेविले खास प्रतींवर
खप ना चार प्रतींचा ।।२।।

परमभाग्य हे नात्यांसाठी
उभे ठाकले फुकटे पाठी
उभा राहिला जमाव सावध
जणु की शोकसभेचा ।।३।।

हा गझलेचा शेर वाचतो
तो चारोळ्यासवे हायकुतो
अभंगोविचा हा रसिकात्मा
वाली ना कवितांचा ।।४।।

(टीप : हायकुतो = हायकू लिहितो,
अभंगोविचा = अभंग नि ओवीचा)

- **व्ही. व्ही. देशपांडे,** सोलापूर
मो. - ९०११६६७१२७

## ☺ कॉम्प्युटर्स

''हॅलोऽऽ कॉम्प्यूटर्स एण्ड कॉम्प्युटर कंपनी?''

''हो! हो!! बोला...

''मी बाळाभाऊ बोलतोय. कालच तुमच्याकडून मी पी.सी. घेतलाय.. पण काही तो चालू होत नाहीये - म्हणजे कॉम्प्युटरबद्दल मला काहीच माहित नाही - अन् कळत नाही.. म्हणून मला छान अगदी लहान मुलांना समजावतात तसं सांगा..''

''ठीक, ठीक!! बाला-बालाऽ जरा तुझ्या मम्मीला फोन दे!''

- मधु रानडे
नाशिक,
दूरध्वनी : २४२२८०८

# मेड फॉर इच अदर

जानेवारीचा 'संवाद' अंक हातात पडला आणि पान आठ वरील 'मोफत' वैद्यकीय चिकित्सा शिबीर हे प्रकटन वाचून माझ्या घरातील सायरन जोरात चालू झाला. अहो, ती बातमी नीट वाचा. नावे नोंदणीत आपला नंबर पहिला लावा - येण्याआधी काय काय खबरदारी घ्यावयाची याची नीट चौकशी करा - नेहमीप्रमाणे नेभळटासारखे मागे राहू नका. अशा उपदेशांचे हाय डोस मला देण्यास सुरूवात झाली. मी 'संवाद'चा अंक शोधून काढला आणि पुणे युनिटचे मन:पूर्वक आभार मानले कारण पुष्कळ प्रयत्नाने त्यांनी हा कार्यक्रम तडीस नेण्याचे धाडस केले. यासाठी सॅमसनसाहेबांचा स्मृतीदिन - डॉ. निरगुडकर कुटुंबियांचे प्रयत्न सह्याद्री सारखे उत्तुंग हॉस्पिटल आणि सर्वात महत्त्वाचे ही वैद्यकीय चिकित्सा मोफत. हल्ली उतारवयात आरोग्य तपासणी-हॉस्पिटल प्रवेश निरनिराळ्या टेस्ट व शेवटी व्हायरस निघतो, मग बँकेकडून परत आलेली बिले पाहून परमेश्वराजवळ प्रार्थना करावीशी वाटते की आयुष्यात-जन्म देतो-मरण येते पण मधल्या काळात 'व्ही.आर.एस' स्कीम काढ. दिसावयास आम्ही किरकोळ असलो तरी व्याधी घाऊक आहेत. आता शिक्षणात ग्रॅज्युएट व डबल ग्रॅज्युअेट पायलीला पाचशे पडले आहेत. तसेच बीपी-शुगर-गुडघेदुखी-गॅसेस-निद्रानाश या गोष्टी किरकोळ आहेत. माणसाला कसे कॉम्प्लीकेटेड आजार अन आयडेंटीफाईड व्हायरस आणि फॉरेनचे जीवाणू येऊन डसले म्हणजे डोक्यापासून पायापर्यंत निरनिराळ्या नवीन यंत्रात पिळून काढले की रोगाचे निदान नाही झाले तरी मनाचे समाधान होते. हल्ली फक्त शेअर मार्केट तेजीत असते. आमचे पेन्शन साधे भाजी मार्केटला पण पुरत नाही. महिना संपता संपता कुडीतील प्राण आणि कुंडलीतील ग्रह खालीवर फिरत असतात. मग हॉस्पिटल मध्ये जाणे तेथे रिकामी कॉट मिळणे - डॉक्टर वेळेवर येणे-उपचार चालू होणे - यामध्ये शृश्रुषा करणारी मावशी व सलाईन देणारा मामा माहेरचे वाटतात. मी लगेच असोसिएशनचे ऑफिसला फोन केला आणि शिबीराची माहिती घेतली. कारण आमचे स्नेहमंडळच्या बहुतेक कार्यक्रमास गुणदर्शन दाखविणारे कलाकार आणि खुर्च्या टेबल लावणारे सहकारी यांचे शिवाय कोणी फिरकत नाही. यामुळे मोफत वैद्यकीय तपासणी हे वाचल्यावर सर्व सभासदांच्या उड्या पडतील असे वाटले. दुसरे म्हणजे वेळ १० ते ३ यामुळे मधल्या वेळच्या जेवणाची सोय असणार असे वाटले. वार्षिक सर्वसाधारण सभेसारखी बायकोचा पुढला प्रश्न होता की साडी कोणती नेसू? परवाचीच चालेल का? सकाळी चहा नाष्टा का उपाशी पोटी? महिलांना प्रथम व स्वतंत्र का जोडी जोडीने-चिकित्सा या शब्दाची चिरफाड चालली होती. असे अनेक प्रश्न घेऊनआम्ही सकाळी दहा वाजता सह्याद्री हॉस्पिटलचे सातव्या मजल्यावर पोहचलो. तेथून पर्वती-सिंहगड व पुणे परिसर सुंदर दिसत होता. परंतु 'तपासणी', 'चिकित्सा' या शब्दांमुळे मला धाप लागली होती. छाती धडधडत होती आणि पाय लटपटत होते. मिसेस म्हणाली, 'अहो घाबरता काय? आपले आता काय राहिले आहे? पेन्शन वाढीचे नंतर कळले तरी फॅमिली पेन्शन घेताना मी ॲरिअर्ससंबंधी आठवणीने विचारीन. आपण आता लिफ्टने आलो आणि जाताना पण कोणीतरी लिफ्ट देईल-नाही रिक्षा मिळाली तर हॉस्पिटलची ॲम्बुलन्स आहे ना?

दहा वाजले आणि कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रथम पाहुण्यांचे स्वागत परिचय कार्यक्रमाची रूपरेषा - नंतर आहार तज्ञ सौ. मालविका करकरे यांचे मार्गदर्शनपर भाषण पंचतत्त्व-पित्त-वात-कफ-पदार्थ-प्रकृती भाज्यांचे प्रकार-फळे-धान्य-कडधान्ये-दूध-तूप-लोणी-आहार विहार-विश्रांती-व्यायाम-पथ्य-कुपथ्य-ऋतुमान-चांगले वाईट-सगळे सगळे छान छान सविस्तर सांगितले. क्षणभर आपण सोवळे नेसून तांबड्या पाटावर केळीचे पानावर पंच पक्वान्नाचे जेवण घेत आहोत असा आनंद झाला व तोंडाला पाणी सुटले पण मिसेसने हातात दोन मारीची बिस्कीटे दिलीआणि जेवणाआधीची शुगरसाठी गोळी दिली. नंतर प्रश्नोत्तरे चालू झाली. पुणे शहरात व्याख्यान असो, प्रवचन असो, श्रद्धांजली असो, मुख्य वक्त्यानंतर श्रोत्याने जर प्रश्न विचारला नाही तर कार्यक्रमाची सांगता झाली नाही असेच वाटते. माझ्या मनात अनेक प्रश्न होते पण विचारण्याचे धाडस झाले नाही कारण हे खा ते खा, हे नको ते नको सगळे समजले. पण हे सर्व झाले अन्न सेवनाचे. सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्ही आता दिवसभर घरीच असतो यामुळे बायकोची बोलणी किती खावयाची हे नाही सांगितले. लहानपणी आईची बोलणी अभ्यासासाठी-मोठे झाल्यावर बाबांची बोलणी चांगली नोकरी शोधण्यासाठी, ऑफिसमध्ये साहेबांची बोलणी कामासाठी आणि सेवानिवृत्तीनंतर बायकोची बोलणी व्यवहार ज्ञान येण्यासाठी. मग औषधे घेण्यास काही पथ्य, व्यायाम यांस सवड होईल का?

तपासणी संपली-हातात रिपोर्ट आले आणि डॉक्टरांनी दोघांना एकत्र बसवून 'मेड फॉर इच अदर' असा शेरा दिला.

माझी उंची ५ फूट ४ इंच तर तिची ५ फूट २ इंच. पण उंच टाचाचे सॅण्डल्समुळे ती उंच दिसते. माझे वजन आणि तिचे वजन अगदी सारखे तरी माझ्यापेक्षा तिचे इम्प्रेशन जास्त पडते.

खरं म्हणजे मला मधून मधून हाय बीपी असते तर सौ.लो बीपीमुळे दमते. पण गर्दीत एकमेकांचा हात धरून चालले तर गर्दीचा त्रास होत नाही आणि बीपी ॲडजेस्ट होते. मला गोड

पदार्थ आवडतात आणि तिकडे तिटकारा म्हणून अधेमधे वडापाव-ब्रेडउसळ इ. खातो.

आम्हाला घरी येण्यास सायंकाळचे पाच वाजले. घराला कुलूप असल्यामुळे धुणेभांडीवाली येऊन गेली. मंडळींनी धुणे पिळले आणि मी भांडी विसळली. पिठलं भात चालेल ना? मी देवापाशी दिवा लावते. तोपर्यंत दुपारची औषधे घ्या- नुसता टी.व्ही.बघू नका आणि पेन्शन वाढीचे विचारू नका. हे करा ते करा, हे नको ते नको, माझ्या स्वास्थ्यासाठी ती दमत होती. पण डॉक्टरांनी 'मेड फॉर इच अदर' असे निदान केल्यामुळे खूप आनंदी दिसत होती. एका वाटीत तूप घेऊन काशीच्या वाटीने माझे तळपाय चोळले. खूप दमला असाल नाही? माझी विचारपूस झाली. अर्धवट झोपेत मी परत म्हणालो-काय म्हणाले ग डॉक्टर? तोंडाला पदर लावून ती म्हणाली, 'मेड फॉर इच अदर' आणि हसली.

- मधुकर पालकर, पुणे
०२०-२४४७१७६६

## आवाहन

आपले काही निवृत्त बंधू आरोग्यदृष्ट्या चांगल्या स्थितीत असून त्यांना समाजसेवा करण्याचीही इच्छा असते. परंतु कोठे व कशी समाजसेवा करता येईल हा त्यांच्यापुढे प्रश्न असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अनेक सेवाकार्ये सुरू केली असून त्यासाठी असे कार्य करू इच्छिणाऱ्यांची खूप जरूरी आहे. ज्यांचे संघाशी तात्विक वा वैचारिक मतभेद असतील त्यांनाही यात भाग घेता येईल. कारण यामध्ये संघाच्या तत्त्वांचा वा विचारांचा प्रसार नसून गरीब, गरजू, अशिक्षित नडलेले अशा लोकांना शिक्षण देणे, शाळेत जाऊ न शकणाऱ्या मुलांना शिकवणे, किरकोळ आजारांवर औषधे देणे, त्यांची कामे कोठे होतील याची माहिती देऊन त्याकामात मदत करणे वगैरे प्रकारची सेवा आहे. याशिवाय आणखी काही प्रकारांनी सेवा करण्याची कोणाची इच्छा असेल तर तेही करता येईल. त्यासाठी मदत व मार्गदर्शन मिळेल.

ज्यांना दूर एखाद्या गावी क्रेंदात जाऊन (एकट्याने किंवा पत्नीसह) काम करणे शक्य असेल त्यांना तसे करता येईल. ज्यांना आपल्या गावीच राहून केंद्रात जाऊन रोज काही वेळ किंवा आठवड्यातून काही वेळ देणे शक्य असेल त्यांना तसेही करता येईल. अशी इच्छा असणाऱ्या पुण्यातील बंधूंनी कृपया श्री सचिन ज. कुलकर्णी, सेवा विभाग प्रमुख, पुणे यांच्याशी फोन नं. ०२०-२४२३२१५१ किंवा चलध्वनी ९७६३७०४८१८ वर संपर्क साधावा. पुण्याबाहेरील बंधूंनी श्री. रत्नाकर वा. पाटील फोन नं. ०२०-२४४५८०८० किंवा श्री. अनिल पां. व्यास फोन ०२०-२५४६४६६१, ९९२२३६६७१४ वर कृपया संपर्क साधावा.

- विजय वामन आगाशे, पुणे

## दंडवत

(स्व. पं. भीमसेन जोशी यांना श्रद्धांजली)
दंडवत अखेरचा, अस्तंगत स्वरभास्कराला।।धृ।।

संगीत साधनेस्तव, सर्वस्व त्यागियले
शिष्यत्व भीमसेने, सवाई गंधर्वाचे पत्करले।
बावनकशी निष्ठा तयाने गुरूचरणी अर्पियली
तुंगभद्रेकाठी स्वरगंगा पवित्र अवतरली।
वियोगे पंडितजींच्या, जीव प्राण तळमळला ।।१।।

तेज बारा सूर्याचे, गुरूकृपे मिळविले
स्वरातून दर्शन ओंकाराचे घडविले।
ध्यास परिपूर्णतेचा जीवनभर जोपासला
अलौकिक प्रतिभेने रसिकवृंद सुखावला।
वारकरी स्वरपंढरीचा, नियतीने हिरावला ।।२।।

संतवाणी, अभंगवाणी अजरामर केली
सुकिर्ती किराणा घराण्याची दुमदुमली।
अधिराज्य स्वर लयींवर भीमसेने गाजविले
'सूर-संगीत' अजरामर, त्रिखंडी झाले।
स्वयंप्रकाशी तारा, नभातून निखळला ।।३।।

पंडित भीमसेन नव्हे, तानसेन गेले
भारतरत्न नव्हे, विश्वरत्न हरवले।
मारवा, पुरिया षड्ज पोरके झाले
अश्रू मोतीयांचे सप्तसूरांनी वाहिले।
गंधर्व भूलोकीचा पंचतत्त्वी विलीन झाला ।।४।
दंडवत अखेरचा, अस्तंगत स्वरभास्कराला ।।धृ।।

- पी.बी.भेंडे, पुसद
भ्रमणध्वनी - ९५५२२९२९०

## वजन

एका जाड्या माणसाच्या मनात वजन करण्याचे आले. तो वजनकाट्याकडे गेला. त्यावर सूचना होती. 'एक रूपयाचे नाणे टाका' त्याने नाणे टाकले आणि उभा राहिला. मशिनवर सूचना आली 'कृपया एक एक करून उभे रहा, सगळे एकदम उभे राहू नका.'

☺

**- भरत जैन,** नाशिक,
भ्रमणध्वनी - ९५०३०५७९९७

## My Diamond Jubilee

On scoring 'sixty' in the life's race
Each year later is a grace!
You tend to lose essential zest
Looking at your empty nest!
Plan to be a slave of exercise,
With nutritious diet to energise!
To preserve the hard earned wealth,
You pray just for good health!
Must occupy your empty mind,
By caring and being kind!
As the wheels of time has carted,
Your journey downhill has started!
So, gift a few ideal measures,
For the next generation to treasure!
No matter how much you strive,
God controls the remote of your life!

- Mrs. Jyoti Khisty, Pune

## काहीकाही

कधीकधी दिसते मला असेच काही
नजरेसमोर येते पूर्वी घडलेले काही काही।
अचंब्यात पडते मग मन माझे
असे का दिसावे? हा प्रश्न उठतो उगाच काही।
कधी असतो मी एकटाच कोषांत गुंतलेला
मनाने भ्रमण करतो, पाहतो ठिकाणे काही काही।
कधी दोस्त माझे दिसतात बँकेतले
रमतांना दिसतो मी तेव्हाच्या बँकेत, असाच काही।
तर कधी ही दिसते मला, पूर्वीची तारूण्यातली
शोधतो आता मी तिच्यांत पूर्वीचे काहीकाही।
सगळे कसे आता स्थिरस्थावर झालेले असते
तरीही चिंता उठते मनात उगाच काही।
निवृत्तीच्या सांजछायेत असतो आता मी बसलेला
झालेल्या चिवडतो चुका, मग अशाच काही।
सगळे करणे हे असतात व्यापार आपल्या मनाचे
कधी बंडी माझी उलार होते हे पण पहातो काही काही।

- रमेश त्रिं. इंगोलीकर, अमरावती
दूरध्वनी - २६७१८८७

## नरदेहाचे प्रत्यार्पण

तनु कर्माची सौगात,
आत्मराज विराजे तयात !

कुडी सदृश्य अन् अशुद्ध,
आत्मा अरूपी परि परमशुद्ध ।

तनुस्थिती पालटे कालप्रभावे,
परि ब्रह्म अविचलच राहे ।

नऊ द्वारे शरीर मल वाही
रोगराईने सदा ग्रस्त राही ।

आत्मरूप तळपे ज्ञानचैतन्ये
सुखानंद अचिंत्य गुणाने ।

परि शरीर आत्मसिद्धीचे साधन,
तू उणे न तयाला जाण ।

घडले बहु नरवीर ह्यातून,
जरा घे उपयोग याचा करून ।

शरीर मुक्तीच्या अंतिम समयी,
भाव तंद्री लाव शुद्ध अंतरी ।

होण्या नवनवेल्या कुडीच्या धनी,
जीर्णशीर्ण ह्या कुडीच्या बदली ।

अविचत वॉरंट येण्यापूर्वी
ठेव रितसर प्रत्यार्पणाची तय्यारी ।।

- सु.र. जैन, औरंगाबाद
भ्रमणध्वनी - ९८६०६१२३५०

## तर

आपले आपणा, कसे झाले ओझे
तरी म्हणे पहा, माझे, माझे, माझे !

कशास जगणे, फुकाच असणे
मृत्यूची चाहूल, तरी मागून न घेणे

असता नसता, फरक न काही
सूर्य माथ्यावर, तरी ढग सारे साही

हातातला हात, सुटतच जाई
झाली घाई, घाई, तरी दु:खात सुख पाही

- **कल्पना कोठारे,**
सांताक्रूझ, मुंबई

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## चहाचे गाणे

(अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर।
आधी हाताला चटके मग मिळते भाकर-संत बहिणाबाई)
अरे संसार संसार, जसा चहा दुधावीण
आधी दुधाला नंबर, मग चहा मिळतो घोटभर ।
नळाला नाही पाणी, पालिकेत माजे रण
पालिकेची येई हाक, करा स्पेशल पाण्यावीण ।।
साखरेच्या राज्यात, साखरेची चणचण
भाव वाट पाहुनिया, चहा झाला कडू जार ।।
चांदीच्या वेष्टणात पत्तीचा थाटमाट
महागाईचा पाहून कहर, भेजा झाला थंडगार ।।
ऐन महागाईत, दिल्लीहून आला साहेबांचा संदेश
कशाला चहा पिता लेको, अरे घ्या वाईच वाईच वाईन ।।

- विनायक कुलकर्णी, कोल्हापूर
दूरध्वनी - ०२३१/२६२०१९२

## गीत

मनातल्या वेदनेने गीत गायिले
आसवांनी हसण्याचे वचन की दिले
घोर नभी सौदामिनी तार छेडिता
वादळांत वायुला ताल गवसता
पंचमस्वर जलदांतून आज उधळले
उदास या नेत्रांची नक्षत्रें उजळली
नि:श्वासातून रम्य गंधफुले उमलली
अश्रूंनी मोत्यांचे हार गुंफिले
निराश या मातीतूनी आशाबीज अंकुरले
तुरे केशराचे कुणी त्यात झुलवले
अत्तर शिंपीत कसे भावमळे फुलले
मंडपात अंतरीच्या सनई गुंजली
स्वप्नमयी त्यात झुंबरे लटकली
धुंदीचे तोरण कुणी आज बांधिले

**- सौ.उज्ज्वल र. ब्रह्मांडकर,**
विरार, ठाणे

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

Printed Matter

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.